७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ११ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## काँग्रेसच्या नेतृत्त्वात भारतात शिखांचा कत्लेआम झाला

### हे सत्य विसरता येणार नाही; मोदी अन् नेहरूंची तुलना करण्याचे कारण नाही - देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



भाजप नेते गिरीश महाजन यांनी पंजाब दौऱ्यात शिखांच्या मुद्द्यावरून केलेल्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. "काँग्रेसने शिखांवर अन्याय केला, असे वक्तव्य करून देशाची बेअब्रू केली जात आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गिरीश महाजन यांच्यावर तोफ डागली होती. शरद पवारांच्या या विधानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. "काँग्रेसच्या नेतृत्वात दिल्ली आणि संपूर्ण भारतात शिखांचा कत्लेआम झाला, हे सत्य असून ते कोणालाही विसरता येणार नाही. काँग्रेसने केलेल्या या अत्याचाराचा निषेध आम्ही जन्मभर आणि शेवटपर्यंत करू," असा घणाघाती पलटवार मुख्यमंत्र्यांनी केला आहे. मुंबईत पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गिरीश महाजन यांच्या पंजाब दौऱ्याची पार्श्वभूमी स्पष्ट केली. मुख्यमंत्री म्हणाले, "मी शरद पवार यांचे संपूर्ण भाषण ऐकलेले नाही, त्यामुळे थेट टिप्पणी करणे योग्य ठरणार नाही. मात्र, गिरीश महाजन यांचे पूर्ण वक्तव्य पाहिले तर कोणताही प्रश्न उरणार नाही. शिखांचे नववे गुरू यांच्या ३०० व्या शहिदी दिनानिमित्त महाराष्ट्र सरकारने मोठे कार्यक्रम आयोजित केले होते. याच कृतज्ञतेपोटी पंजाबमधून महाराष्ट्र सरकारचा गौरव करण्यासाठी गिरीश महाजन यांना निमंत्रण आले होते." गिरीश महाजन यांच्या दौऱ्याबाबत पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, "गिरीश महाजन यांनी तिथे जाऊन केवळ दर्शन घेतले. ते अतिशय थोडा वेळ त्या कार्यक्रमात उपस्थित होते. त्या कार्यक्रमाच्या पाठीमागे कोणाचा फोटो लागलेला आहे, याची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. त्यांनी आपल्या भाषणात केवळ शीख समाजाचा गौरव केला आहे. भारताच्या वाटचालीत शीख समाजाचे योगदान आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने केलेले कार्य यावरच महाजन बोलले आहेत. तसेच पंजाबमधील वाढत्या ड्रग्सच्या समस्येवर त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यामुळे त्यांच्या या विधानाकडे अन्य कोणत्याही राजकीय दृष्टिकोनातून पाहण्याची गरज नाही." शरद पवारांनी गिरीश महाजन यांच्या विधानावरून भाजपवर देशाची बेअब्रू केल्याचा आरोप केला होता. त्याला उत्तर देताना फडणवीसांनी थेट काँग्रेसच्या काळातील शीख दंगलींच्या जखमांवर बोट ठेवले. शिखांचा दिल्लीमध्ये, पंजाबमध्ये, संपूर्ण भारतात कत्लेआम झाला.

> “पंतप्रधान मोदींचा कार्यकाळ हा देशातील २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर आल्याचा काळ आहे. देशामध्ये रस्ते, रेल्वे, पोर्ट, एअरपोर्ट सर्व प्रकारच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे जाळे तयार झाल्याचा हा काळ आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेने मोठी भरारी घेत, जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून नाव कमावले, तो हा सुवर्ण काळ आहे. शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वाधिक निधी केंद्र सरकारने दिला, तो हा काळ आहे. या काळात आत्मनिर्भर भारत तयार होताना आपण बघितला. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जगाच्या पाठीवर भारताची शक्ती आपण दाखवू शकलो. जो भारत संपूर्ण शस्त्रात्रे आयात करत होता, आज तो हजारो कोटी रुपयांचे शस्त्रात्रे निर्यात करतोय. भारताने युपीआयच्या माध्यमातून डिजिटल पेमेंट सिस्टम गेटवे जगाला दिला आणि जगातील ३० देश युपीआय वापरत आहेत, असा भारत मोदींनी उभा केला आहे,” असे फडणवीस म्हणाले.

## मुंबई, पुणे महापौर कार्यालय अन् RSS मुख्यालय उडवून देऊ

**पुणे (दै. संध्या)**



मुंबई-पुण्याचे महापौर कार्यालय आणि नागपूरमधील संघ मुख्यालय आयईडी बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. दुसरीकडे अहमदाबाद आणि गांधीनगरमध्ये आज 10 जून ते 20 सप्टेंबर दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याच्या गंभीर धमकीचे ईमेल मिळावलेत. खालिस्तान नॅशनल आर्मीच्या नावाने ही धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे संवेदनशील भागांत सुरक्षा कडक करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाठवण्यात आलेल्या या धमकीच्या ई-मेलमध्ये केवळ मुंबई-पुणे महापौर कार्यालयच नव्हे, तर नागपूरमधील काही संवेदनशील ठिकाणे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय देखील लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या धमकीमध्ये आयईडी बॉम्बस्फोटाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून, हा घातपात घडवून आणण्यासाठी काही विशिष्ट वेळा आणि तारखांचाही संशयास्पद संदर्भ या ई-मेलमध्ये देण्यात आला आहे. या धमकीच्या ईमेलमध्ये अत्यंत पद्धतशीरपणे वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या वेळा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये पुण्याच्या महापौर कार्यालयात दुपारी 1:11 वाजता, तर पुण्याचे विधान भवन आणि नागपूरमधील रेशीमबाग येथील आरएसएस मुख्यालय (डॉ. हेडगेवार भवन) येथे दुपारी 3:11 वाजता स्फोट घडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, 10 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीत पुणे आणि नागपूरमधील आरएसएसच्या विविध शाखांना सकाळी 6:11 ते रात्री 9:11 च्या दरम्यान लक्ष्य केले जाईल, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## संपूर्ण वस्त्रातील स्त्रीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न : रूपाली चाकणकरांचा संताप

**मुंबई (दै. संध्या)**



अशोक खरात प्रकरणावरून आपल्यावर आणि कुटुंबावर करण्यात आलेले आरोप अत्यंत वेदनादायी असल्याचे सांगत रुपाली चाकणकर यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. "संपूर्ण वस्त्रातील स्त्रीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न काही विकृत लोकांनी केला," अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त करत बदनामी करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच अनेकांना कायदेशीर नोटिसाही पाठवल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रुपाली चाकणकर म्हणाल्या की, अशोक खरात यांच्या कोणत्याही आर्थिक व्यवहाराशी त्यांचा कधीही संबंध नव्हता. तसेच कोणत्याही महिलेला आपण खरात यांच्याकडे घेऊन गेलो असल्याचा आरोपही पूर्णपणे खोटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या कुटुंबीयांनी खरात यांना गुरुस्थानी मानले होते आणि सोशल मीडियावर व्हायरल झालेला पाद्यपूजेचा व्हिडीओही जुना असल्याचे त्यांनी सांगितले. खरात प्रकरणाचा तपास निष्पक्ष आणि पारदर्शक व्हावा यासाठी आपण राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला होता, याची आठवण करून देत चाकणकर म्हणाल्या की, आता त्यांची लढाई कायद्याच्या चौकटीतून सुरू राहणार आहे. सोशल मीडियावर तसेच विविध माध्यमांतून बदनामी करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून अनेकांना कायदेशीर नोटिसा पाठवण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. "विकृत प्रवृत्तीच्या लोकांविरोधातील ही माझी लढाई आहे. सत्य बाहेर येईल आणि कायद्याच्या माध्यमातून योग्य उत्तर दिले जाईल," असे म्हणत रुपाली चाकणकर यांनी या प्रकरणात आपली भूमिका पुन्हा अधोरेखित केली. त्यांच्या या भूमिकेमुळे अशोक खरात प्रकरणाला आता नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नेहरूंचे योगदान विसरून चालणार नाही : पवारांचा निशाणा

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा वर्धापन दिन : वर्धापन दिनी मोदी सरकारवर अप्रत्यक्ष टीका

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात शरद पवार यांनी देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या तुलनेवर स्पष्ट भूमिका मांडली. "मोदी किती वर्षे पंतप्रधान राहिले हा वेगळा विषय आहे, मात्र नेहरूंच्या कर्तृत्वाशी आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाशी त्यांची तुलना होऊ शकत नाही," असे पवार म्हणाले.

यावेळी त्यांनी नेहरू, महात्मा गांधी आणि इंदिरा गांधी यांच्या देशासाठीच्या योगदानाचा उल्लेख केला. स्वातंत्र्यलढ्यातील नेहरूंचा संघर्ष, तुरुंगवास आणि देशनिर्मितीतील भूमिका अधोरेखित करत इतिहास विसरता येणार नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच इंदिरा गांधींवरील टीकेलाही प्रत्युत्तर देत, देशाची जागतिक पातळीवरील प्रतिष्ठा वाढवण्यात त्यांचे मोठे योगदान असल्याचे पवारांनी नमूद केले.

शरद पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्ष टीका करत देशासमोरील बेरोजगारी, आदिवासी, महिला आणि अल्पसंख्याकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. "देशात अनेक गंभीर समस्या आहेत, मात्र सत्ताधाऱ्यांची त्या प्रश्नांबाबत किती आस्था आहे, यावर भाष्य न केलेलेच बरे," असा टोला त्यांनी लगावला. तसेच काही जणांकडून इतिहास पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत स्वातंत्र्यलढ्यातील नेते आणि काँग्रेसच्या योगदानाचे महत्त्व कमी करून चालणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चा २७ वा वर्धापन दिन आज राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येत आहे. मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे मुख्य सोहळा पार पडत असून, छत्रपती संभाजीनगरसह विविध ठिकाणी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनीही कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत पक्षाच्या वैचारिक वारशाला उजाळा दिला.

सुप्रिया सुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये, “आजच्याच दिवशी आदरणीय पवार साहेबांनी पक्षाची स्थापना केली होती,” असे म्हणत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या २७ वर्षांच्या प्रवासाचा उल्लेख केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

आज आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिन...! आजच्याच दिवशी आदरणीय पवार साहेबांनी पक्षाची स्थापना केली होती. गेल्या अडीच दशकांहून अधिक काळ आपण देशाच्या राजकीय आणि सामाजिक जडणघडणीत सक्रिय योगदान देत आलो आहोत.

स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी दिलेला ‘८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण’ हा विचार आपल्या कामाचे सूत्र आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देत जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याची भूमिका आपण जपली आहे आणि यापुढेही ती अधिक दृढपणे पुढे नेऊ. आपली निष्ठा महाराष्ट्राच्या प्रागतिक विचारधारेशी तर बांधिलकी येथील जनतेशी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा वैचारिक वारसा कायम ठेवण्याचा आपण कसोशीने प्रयत्न केला आणि यापुढेही करु.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




### आम्ही वारंवार आंदोलन करायचं आणि सरकारने हलक्यात घ्यायचं?

## मनोज जरांगेंचा फडणवीस-विखेंना थेट इशारा

**बीड (दै. संध्या)**

■ **मराठा-ओबीसी दरी वाढवण्याचा प्रयत्न का केला जातोय?**



मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्रांच्या वाटपाच्या प्रश्नावरून मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारकडून वारंवार आश्वासने दिली जातात, मात्र प्रत्यक्षात निर्णय घेतले जात नाहीत, असा आरोप करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना थेट इशारा दिला आहे. "आम्ही वारंवार आंदोलन करायचं आणि सरकारने आम्हाला हलक्यात घ्यायचं, असे असेल तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राधाकृष्ण विखे-पाटील यांना पुढचा काळ जड जाईल," असे जरांगे पाटील यांनी बीड येथे माध्यमांशी बोलताना म्हटले. जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सरकारकडून सातत्याने टाळाटाळ केली जात आहे. "मराठा समाजाचा वारंवार अवमान केला जात आहे. हे असेच सुरू राहिले तर 2029 च्या निवडणुकीत मराठा समाज त्याचा हिशेब चुकता करेल. समाजाचा अवमान करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल," असा इशाराही त्यांनी दिला. त्यांनी सरकारला थेट सवाल करत म्हटले की, "हैदराबाद गॅझेटमधील नोंदी उपलब्ध आहेत, ऐतिहासिक पुरावे आहेत, तरीही आरक्षण का दिले जात नाही? तुम्ही नेमके कुणाला घाबरून हे करत आहात?"

मराठा आणि ओबीसी समाजामध्ये निर्माण होत असलेल्या वादावरही जरांगे पाटील यांनी भाष्य केले. "आम्ही ओबीसी समाजाचे आरक्षण कमी करून आम्हाला द्या, असे कधीच म्हणालो नाही. आम्ही आमच्या हक्काचे आरक्षण मागत आहोत. आमच्या नोंदी असतील तर आम्हाला आरक्षण देण्यात अडचण काय?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांनी दावा केला की, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात मराठा समाजाच्या कुणबी नोंदी सापडल्या होत्या. मात्र काही अधिकाऱ्यांनी त्या नोंदी हटवल्याचा आरोप त्यांनी केला. जरांगे पाटील यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत म्हटले की, "वडवणीतील तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी नोंदी हटवल्या आहेत. नोंदी हटवण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला? याची चौकशी झाली पाहिजे." सरकारने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

"मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जातोय, हे समजत नाही. स्वतःला तज्ज्ञ म्हणवून घेणाऱ्या लोकांनाही ही बाब का समजत नाही?" असा सवाल करत जरांगे पाटील यांनी दोन्ही समाजांमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. त्यांनी पुन्हा स्पष्ट केले की, मराठा समाजाची मागणी ही स्वतंत्र हक्काची असून कोणत्याही समाजाच्या आरक्षणावर अतिक्रमण करण्याची नाही.

मनोज जरांगे पाटील हे बीड दौऱ्यावर असताना त्यांनी आंदोलनादरम्यान अपघातात जखमी झालेल्या एका मराठा सेवकाची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. अंतरवली सराटी येथील आंदोलनातून परतताना या कार्यकर्त्याचा अपघात झाला होता. त्याच्या प्रकृतीची विचारपूस केल्यानंतर जरांगे यांनी माध्यमांशी संवाद साधत सरकारवर निशाणा साधला. गेल्या वर्षभरात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यात अनेक आंदोलने झाली आहेत. सरकारने विविध निर्णय आणि समित्यांच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला असला, तरी मनोज जरांगे पाटील आणि आंदोलनकर्ते अद्याप समाधानी नसल्याचे दिसून येत आहे.

## पत्नीला नांगराला जुंपल्याचा व्हिडिओ व्हायरल

### *विरोधकांच्या टीकेनंतर मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्याला मदतीचा हात, नांगरणीसाठी बैल, ३२ हजारांचे अनुदानही मंजूर*

**लातूर (दै. संध्या)**



लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. विजेच्या तडाख्यात एक बैल दगावल्यानंतर दुसरा बैल खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसल्याने त्यांनी आपल्या पत्नी औसाबाई यांना नांगराला जुंपून शेताची नांगरणी केल्याचे या व्हिडिओत दिसून आले होते. या घटनेमुळे राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली होती. या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत जिल्हा प्रशासनाला आवश्यक मदतीचे निर्देश दिले. मुख्यमंत्र्यांनी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून जवळच्या गोशाळेतून शेतकऱ्याला नांगरणीसाठी बैल उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तसेच नव्याने बैल खरेदी करता यावा यासाठी ३२ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. काशिनाथ गायकवाड यांच्यावर काही दिवसांपूर्वी दुहेरी संकट कोसळले होते. शेतातील मशागतीची कामे सुरू असताना वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांचा कडकडाट झाला. यावेळी वीज कोसळून त्यांच्या दोन बैलांपैकी एक बैल जागीच ठार झाला. शेतीचा मुख्य आधारच हिरावल्याने गायकवाड कुटुंब अडचणीत आले. दुसरा बैल खरेदी करण्यासाठी आवश्यक पैसे नसल्याने त्यांनी पत्नीच्या मदतीने नांगरणी करण्याचा निर्णय घेतला होता.

### मान्सूनची व्याप्ती वाढणार

सध्या मान्सून राज्यभरात पोहोचत आहे. मुंबई, कोकण परिसरात पावसाचे आगमन झाले आहे. वातावरणात गारवा जाणवत आहे. मान्सून सध्या मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राचा भाग व्यापून टाकतो आहे. मान्सून हा दाक्षिण कोकण आणि सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यात अगोदरच दाखल झाला आहे. आणखी दोन दिवसात त्याची व्याप्ती वाढणार आहे. त्यामुळेच सध्या पाऊसमान कमी असल्याने कमी पाण्यावर येणारी पिके घ्यावीत, असे आवाहन केले जात आहे. मुख्यमंत्री कार्यालयानेदेखील 15 जूनपर्यंत मोठा पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे सांगितले आहे.

# संपादकीय

## विश्वास, विकास आणि जनसहभागाचे तप!

१२ वर्षे म्हटले की पुढे आपण सवयीने एक तप असे म्हणतो. तप या शब्दातच तावून-सुलाखून निघण्याचा संघर्ष आहे, ध्येयपूर्तीसाठी करायचे सातत्यपूर्ण प्रयत्न आहेत आणि लक्ष्यप्राप्तीसाठीचा संकल्प. त्यामुळे जेव्हा आपण पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाचे एक तप पूर्ण झाले, असे म्हणतो तेव्हा तिन्ही कसोटीवर या काळाचे परीक्षण केले जाणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने बघितले तर हा काळ म्हणजे सेवा, समर्पण आणि सुशासन यांचा सुवर्णकाळ आहे. तपश्चर्येला दोन बाजू असतात. ही तपश्चर्या समाजासाठी असली तर त्याचे फळ समाजालाच मिळते, समाजातील अनेक घटकांना त्याचा लाभ होतो. मोदीजींच्या या तपश्चर्येचे फळ म्हणजे भारतातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आलेली अभूतपूर्व क्रांती आहे. मोदीजींची २०१४ ते २०२६ ही १२ वर्षांची वाटचाल एका परिवर्तनकारी युगाची साक्ष देणारी आहे. ही केवळ सत्तेची बारा वर्षे नसून, विश्वास, विकास, सुशासन, सांस्कृतिक पुनर्जागरण आणि जनकल्याण यांचा अभूतपूर्व संगम आहे. आज आणखी एक विशेष बाब आहे, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सलग ४३९९ दिवस मोदीजींनी पूर्ण केले. असे करताना त्यांनी पं. नेहरू यांचा विक्रम मोडला. नेहरूजी आणि मोदीजी यांची तुलनाच होऊ शकत नाही अशी वल्गना काही लोक करतील. नेहरूजी ज्या काळात प्रधानमंत्री झाले तेव्हा नेहरूजींना पर्याय नाही अशीच काहीशी भारतीय समाजाची मानसिकता होती, पण मोदीजी जेव्हा प्रधानमंत्री झाले तेव्हा लोक संवैधानिकदृष्ट्या प्रगल्भ झाले होते. त्यांना मतदानाचा अधिकार, त्याचे महत्त्व समजले होते. आपल्या आशा-आकांक्षा काय आहेत, याची जाणीव स्पष्ट झाली होती. सरकार लोककल्याणासाठीच आहे हे त्यांना माहिती होते. अशा काळात मोदीजी यांचे सरकार आले होते, त्यामुळे जे काँग्रेसला ५०-६० वर्षांत जमले नाही ते करून दाखवण्याचे आव्हानच जनतेने त्यांच्या नेतृत्वाला भरभरून मते देऊन २०१४ मध्ये दिले आणि त्या आव्हानाला शिरोधार्ह मानत मोदीजींचा 'सब का साथ, सब का विकास' हा प्रवास सुरू झाला. मग 'सब का विश्वास, सब का प्रयास' असे वेळोवेळी जोडले गेले. २०१४, २०१९ आणि २०२४ असे यशाचे टप्पे पार करत ते आज भारताला वैश्विक नेतृत्व प्रदान करीत आहेत. २०१४ आणि २०१९ मधील सुस्पष्ट जनादेशानंतर २०२४ मधील विजय हे केवळ निवडणुकीतील यश नव्हते, तर जनतेने विकास, सुशासन आणि स्थिर नेतृत्वावर व्यक्त केलेला पुनर्विश्वास होता. १९६२ नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपद मिळवणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते ठरले. जगातील अनेक लोकशाही व्यवस्था राजकीय अस्थिरतेशी झुंज देत असताना भारताने स्थैर्य, सातत्य आणि निर्णायक नेतृत्वाचा मार्ग निवडला. गेल्या दशकात मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राजकीय स्थैर्याला विकासाची जोड दिली. आर्थिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन, पायाभूत सुविधा विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रभावी परराष्ट्र धोरण यामुळे भारत आज जागतिक स्तरावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी राष्ट्र म्हणून उदयास आला आहे. २४हून अधिक राष्ट्रांनी त्यांना दिलेले सर्वोच्च सन्मान ही त्याची पावती आहे.

हा फक्त एक नेतृत्वाचा प्रवास नव्हता, यामध्ये भारतीय जनता सहभागीदार होती हेच या प्रवासाचे वैशिष्ट्य आहे आणि फलित म्हणाल तर भारताची अर्थव्यवस्था २ ट्रिलियन डॉलरवरून ४.१८ ट्रिलियन डॉलर्स! जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था. सामाजिक न्यायाची स्थापना करायची असेल तर आधी आपली आर्थिक बाजू समृद्ध असली पाहिजे, हे मोदीजींनी फक्त जाणले नाही तर त्यासाठी त्यांनी सर्वस्तरावर प्रयत्न केले. मेक इन इंडिया असो किंवा आत्मनिर्भर भारत असो; यांनी भारतीयांना आत्मविश्वास तर दिला, पण भारतीय वस्तूंबद्दल जगामध्ये विश्वास जागवला. आज स्वदेशी शस्त्रास्त्रांची मागणी इतकी वाढली आहे की, पुढील दहा वर्षांचे उत्पादनही अपुरे पडेल. हीच आत्मनिर्भर भारताची खरी ताकद आहे.

## संस्कृत सुभाषित

परिच्छिन: स्वादोऽमृत गुडमधुक्षौद्रपयसां कदाचितदभ्यासाद्भजति
ननु वैरस्यमधिकम्।प्रियाबिम्बोष्ठे वा रुचिरकविकाव्येऽ
प्यनवधि–नवानन्द: कोपिस्फुरति तु रसोऽसौ निरुपम:।।

अर्थ – अमृत, गूळ, मध, द्राक्ष, दूध यांचा स्वाद व चव निश्चित असते पण त्यांचे सतत सेवन केल्यानंतर त्यांची गोडी समजण्याच्या पलीकडे जाते, त्यांचा कंटाळा येतो पण प्रेमिकेच्या ओठाच्या चुंबनाची गोडी आणि कवीच्या सुंदर काव्याची गोडी ही सदैव अवीट आणि निरुपम असते.

## गुरु वचन

### सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे–श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती–प्रेम–समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सदगुण–संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

## उपदेशकथा

### आश्रय

एका माणसाला एकदा सापाचं पिल्लू मिळालं. त्यानं ते घरी आणलं व तो त्याची देखभाल करू लागला. त्याला बांबूचं नळकांडं करून दिलं. त्यात गवत वगैरे घालून त्याच्या राहण्याची सोय करून दिली. त्याला खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली. एकदा एक साधू तिथं आला. त्यानं हे पहिलं व तो त्या माणसाला म्हणाला, ''हे काय करतोस भलतंच तू ! भलत्यावर प्रेम करून त्याला आश्रय देणं धोक्याचं आहे. उद्या तुझ्यावर जीवित गमावण्याची वेळ येईल. तेव्हा वेळीच सावध हो आणि हा नाद सोडून दे.'' त्या माणसावर या उपदेशाचा काही परिणाम झाला नाही. एकदा काही कारणानं तो माणूस दोन दिवस बाहेरगावी गेला होता. तेथील सारी कामे आटोपून तो घरी परतला. आल्यावर त्यानं आपल्या लाडक्या सापाला हाक मारली. तो बाहेर येईना म्हणून त्याच्या घरात हात घातला. त्याबरोबर त्या सापानं दंश केला वत्या माणसाला प्राण गमवावे लागले.

कथा उपदेश : दुष्टाला आश्रय देऊ नये.



## पंचांग

| | |
|---|---|
| ११ जून २०२६ | नक्षत्र:रेवती ०८:१६:०९ |
| गुरुवार | योग:शोभन २४:५९:३३+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव ११:५२:३० |
| अधिक ज्येष्ठशके | करण:बालव २२:३६:३० |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मेष०८:१६:०९ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २५ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:एकादशी | कमला एकादशी |
| २२:३६:३० | पारशी बेहमन मासारंभ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | | | | | | 2 | |
| 3 | | | | | 6 | | | 7 |
| 9 | | 5 | | 8 | | | 3 | 6 |
| | | | 1 | | 9 | | | 2 |
| | 5 | | 6 | 7 | 8 | | 4 | |
| 6 | | | 3 | | 4 | | | |
| 1 | 6 | | | 3 | | 5 | | 8 |
| 5 | | | 9 | | | | | 4 |
| | 7 | | | | | | 6 | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९७५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 3 | 4 | 1 | 5 | 8 | 2 | 6 |
| 5 | 4 | 6 | 8 | 2 | 3 | 1 | 7 | 9 |
| 8 | 1 | 2 | 6 | 9 | 7 | 4 | 5 | 3 |
| 6 | 7 | 8 | 2 | 5 | 4 | 3 | 9 | 1 |
| 1 | 5 | 4 | 9 | 3 | 6 | 2 | 8 | 7 |
| 2 | 3 | 9 | 1 | 7 | 8 | 5 | 6 | 4 |
| 3 | 8 | 1 | 7 | 6 | 2 | 9 | 4 | 5 |
| 9 | 2 | 7 | 5 | 4 | 1 | 6 | 3 | 8 |
| 4 | 6 | 5 | 3 | 8 | 9 | 7 | 1 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३८ – बेलज्यीअममध्ये भूकंप.
- १९९१ – मैक्रोसॉफ्टने एमएस डॉस ५.० लांच केले.
- १९९४ – मोशुद अबीओला नायजेरियाचे राष्ट्रपती बनले.

### राष्ट्रीय

- २००६ – 'पृथ्वी' या देशाच्या अत्याधुनिक आणि जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चांदीपूर रेजहून यशस्वी प्रायोगिक चाचणी करण्यात आली.
- २००७ – मल्लिका शेरावतने आशियाच्या शंभर सुंदर जणांच्या यादीत स्थान मिळवले.
- २००८ – जगातील २५ संस्थांपैकी ३ भारतीय संस्था पीपल लाइक अस (प्लस) , संघमित्रा आणि संकल्प यांना 'रेड रिबन' पुरस्कार जाहीर झाला.

### जन्म

- १९२० – नेपाळचे राजा बीर बीक्रम शाह देवा महेंद्रा यांचा जन्म.
- १९३५ – पाकिस्तानी क्रिकेटपटू शेख फजलुर रेहमानचा जन्म.
- १९४७ – रेल्वे मंत्री व राजद नेते लालू प्रसाद यादव यांचा जन्म.
- १९५१ – वेस्टइंडीजच्या क्रिकेटपटू कोलीस किंगचा जन्म.

### निधन

- १९२४ – इतिहास संशोधक व नाटककार वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन.
- १९५० – बालसाहित्यिक, समाजवादी नेते आणि स्वातंत्र्य सैनिक पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ साने गुरूजी यांचे निधन.
- १९८३ – नामवंत उद्योगपती घन–श्याम बिर्ला यांचे निधन.
- २००० – काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री राजेश पायलट यांचे निधन.

## : SMS :

Gadhi Ne Gadhe
Se Pucha:
Aaj Mai Kaisi
Lag Rahi Hun?
.
.
.
Gadhe Ne Kaha:
Bilkul "Kareena
Kapoor."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.२ | २५.५ |
| अहमदनगर | ३७.५ | २५.२ |
| अकोला | ४३.९ | ३१.७ |
| अमरावती | ४४.६ | ३१.७ |
| बीड | ४७.६ | ३६ |
| भंडारा | ४७.३ | ३३.९ |
| बुलढाणा | ४३.५ | २७ |
| चंद्रपूर | ४५.६ | ३४.७ |
| चेन्नई | ४३ | ३३.१ |
| नवी दिल्ली | ४४.९ | ३५ |
| धुळे | ४३.२ | २९.१ |
| गोंदिया | ४५.५ | ३३ |
| जळगाव | ४४.४ | ३०.९ |
| कोल्हापूर | ३१.८ | २४.४ |
| लातूर | ३८.४ | २६.१ |
| मुंबई | ४१.७ | ३५.२ |
| नागपूर | ४५.२ | ३४.७ |
| नांदेड | ४१.१ | ३१.५ |
| नंदूरबार | ३९.६ | २६.५ |
| नाशिक | ३७ | २५.८ |
| पुणे | ३४.२ | २४.१ |
| पंढरपूर | ३९ | २५.८ |
| सातारा | ३५ | २४.८ |
| सांगली | ३५.२ | २४.९ |
| सोलापूर | ३८.३ | २५.९ |
| वर्धा | ४६.५ | ३४.८ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**धनु :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व
जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल. सासू–सुनातील दुरावा कमी करा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व
तब्येतीची प्रसन्न साथ, घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. नोकरदारांना नोकरीतील बदल लाभदायक ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर
मामा, मावशी किंवा सासुरवाडीचे व्यवहार बिघडू देऊ नका. मुलांच्या वागण्याकडे लक्ष ठेवा.

**कन्या :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : उत्तर
अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर
आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील. वृद्धांच्या तब्येती सांभाळा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७६



**आडवे शब्द**
१. महाराष्ट्राचा गावरान मेनू
६. गुन्हा
९. पत्नी
११. जुगार
१२. प्रत्यक्ष, देखत
१४. घाऊक, मोठे
१६. दया दाखविणारा परमेश्वर
१८. चटकन, त्वरित
१९. पवित्र, शंकर
२०. लोंगर
२२. स्वाभिमानी, तडफदार
२४. कट्टर
२६. अति उंचावरून फिरणारा पक्षी
२७. हे घेऊन ते, याच्या ऐवजी ते!
२८. प्रजा
३०. उघडण्याचा रंग
३१. कर भरणारा
३३. चुलता
३४. गव्हल्याचा खिरीत घालण्याचा एक प्रकार, मुलींचे एक नाव
३६. खवचट, खोचक
३८. सूर्य, आदित्य
३९. मातीचा कण
४०. न सडलेला, अख्खा भात
४१. प्रतिसाद
४२. नंतर
४४. पीडा, ज्वर
४६. कॉम्प्युटरला मराठी शब्द
४८. देवाची प्रार्थना, स्तोत्र इ.
५१. जवळ
५३. लंकेचा राजा
५४. कापड मोजण्याचे माप
५५. पडदा
५६. दाराची झडप
५८. नियमित यात्रा करणारा
६०. उत्साही, चुणचुणीत
६२. 'शामची आई'चे लेखक '–– गुरुजी'
६५. तात्पर्य
६७. चाळीस शेर
६८. मधली बहीण
६९. सततचे नामस्मरण
७०. त्रासणे, रागावणे (बोलीभाषेत)
७१. रंगविलेले
७२. दिवा उजळणारी
७३. चप्पल
७४. झाडावर पिकू लागलेले फळ
७५. खटपट
७६. पाणी
७७. सूर्याचे एक नाव
७८. अकस्मात
७९. दिवस
८०. मठ्ठ

**उभे शब्द**
१. वाऱ्याची हलकी लाट
२. विनाकारण
३. वाळवी, उणीव
४. जोरदार धपाटा
५. अत्यंत संथ चालणारा प्राणी
६. झीज होणार नाही असे
७. श्रीरामाचे एक नाव, ८. नवरा
९. भविष्यातील
१०. प्रतिष्ठित
१३. मध
१५. खानदान
१७. मिठी
१८. रेशमाची गुंडाळी, २०. घरी तयार केलेले
२१. फेस अणणारा
२२. मुलांसाठी लिहिलेले काव्य
२३. शत्रू, हरकतदार
२५. आरोळी, ललकारी
२७. नाथपंथियांचा गजर
२९. काळजी, फिकीर
३२. भारतातील जगप्रसिद्ध संगमरवरी ऐतिहासिक वास्तू
३३. व्याकूळ, घाबरा
३५. पाकळ्यांचा पांढरा कंद
३७. एकूणएक, सर्व
४३. गाजावाजा
४५. अनेक प्रकाराने, सर्व तऱ्हेने
४६. काम बंद!
४७. तिरका होत, घरंगळत
४८. दैवगती
४९. बाण
५०. पारख, दृष्टी
५२. नाकदुऱ्या (हिंदी)
५६. कातरलेले तुकडे
५७. पंढरीची यात्रा
५९. खाटीक
६१. पाताळ, गर्ता
६२. जीव
६३. कंजूष
६४. रात्रभर
६६. बक्षीसाचा पेला
६७. हेतू, कारण
६८. मातीच्या रंगाचे वा वासाचे
६९. उग्र, कडवा
७२. उपयोग
७३. भार, बोजा
७४. जेवणाचे ताट

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७५ चे उत्तर

आडवे उत्तर १.नकुल सहदेव ६.सावरकर ९.पास ११.रवळनाथ १३.साट १४. मुलगा १५.लहानसा १७.चल १८.कळक १९.रम २०.थोरला २२.पापा २३.टवका २६.कसर २८.डबा ३०.नकळत ३१.रामायण ३२.लाड ३३.सकारात्मक ३४.अंतर ३५.पारखा ३६.लाजरा ३८.वाडी ३९.सरोज ४१.धागा ४२.गुळगुळीत ४४.मारवा ४६.जपतप ४८.डहाळी ५०.सम ५२.रीत ५३.बरोबर ५६.करकटक ५९.दाम ६०.भाळ ६१.रंक ६२.तकलादू ६३.सारभात ६५.सरोद ६७.सह ६८.हलाखी ६८अ.रन ७०.कलह ७३.बात ७४.काव ७५.ठोकणी ७७.यातायात ७९.प्रवाद ८०.हिरीरी ८१.करकरीत ८२.सण

उभे उत्तर : १.नक्कल २.लहानथोर ३.हर ४.देव ५.वळचण ६.साथ ७.रसाळ ८.कटकट ९.पालम १०.सगा १२.नाल १४.मुरका मारणे १६.सार १८.कपाळ २१.लाडका २२.पाक २४.वरात २५.खाणकामगार २६.कला २७.सडपातळ २९.बाराखडी ३०.नकलाकार ३३.सखा ३४.अंदाजपत्रक ३७.रास ३८.वातड ४०.रोज ४२.गुलाबदाणी ४३.गुलाब ४४.माळी ४५.वासर ४७.परीक्षक ४९.हारा ५१. मकरंद ५४.रोम ५५.रखरखीत ५६.कळस ५७.टक ५८.विदूषी ६२.तहहयात ६३.सालाबाद ६४.तरकारी ६६.रोखठोख ६७.सल ६९.नवरी ७०.कणीक ७१.प्रयास ७२.विप्र ७४.वाद ७६.कर ७८.तण

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग यांच्यातील दरी दूर करण्यासाठी समन्वयाची गरज

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा

पुणे (दै. संध्या)

संशोधन आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील दरी दूर करण्यासाठी विद्यापीठे, उद्योग, स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय संस्था यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (सीओईपी) तंत्रज्ञान विद्यापीठ आणि कॅनियस इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे इंटरनॅशनल सेंटर, पाषाण येथे १० ते १२ जून दरम्यान आयोजित 'तंत्रज्ञान संक्रमण आणि नवोपक्रम गतीवर्धक' या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरूड, कॅनियस इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पिंपरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, सीओईपी आणि कॅनियस इंटरनॅशनल यांच्यात झालेला सामंजस्य करार हा केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून संशोधन आणि प्रत्यक्ष परिणाम यांमधील दरी दूर करण्याचा दृढ संकल्प आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राला नवोपक्रम आणि सहकार्याचे केंद्र बनविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे.

सीओईपी ही देशातील सर्वात प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक संस्थांपैकी एक असून तिने उत्कृष्ट अभियंते, तंत्रज्ञ, प्रशासक, उद्योगपती, उद्योजक आणि विचारवंत घडविले आहेत.




मिलिंद पिंपरकर यांनी आपल्या प्रास्ताविकात या कार्यशाळेचे प्रयोजन विशद करतांना, भारत देश जागतिक दर्जाचे हब होण्यासाठी अधिकाधिक संशोधन, नवोपक्रम आणि यात गतिमानता येण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे. त्यासाठी अशा कार्यशाळा महत्वाच्या असल्याचे सांगितले. यावेळी या कार्यशाळेच्या निमित्ताने तयार केलेल्या 'हॅन्डबुक' चे राज्यपाल आणि इतर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रा. भिरूड यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

राष्ट्रनिर्मितीत या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण असून ती भारताच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक आकांक्षांचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील २९ विद्यापीठांचे कुलपती म्हणून विविध विद्यापीठांतील संशोधन कार्याचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, देशात उच्च दर्जाचे संशोधन होत असले तरी नवोपक्रम आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी आहे. अनेक मौल्यवान संशोधन प्रकल्प प्रयोगशाळा, शैक्षणिक नियतकालिके आणि परिषदांपुरते मर्यादित राहतात. त्यांचे रूपांतर उद्योग, शासन आणि समाजासाठी उपयुक्त, परिणामकारक आणि व्यापक प्रमाणावर वापरता येणाऱ्या उपायांमध्ये होणे आवश्यक आहे.

देशात १.३ लाखांहून अधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स आणि हजारो संशोधन प्रकल्प सुरू असतानाही त्यांपैकी मोजक्याच नवकल्पना बाजारपेठेपर्यंत पोहोचतात. विद्यापीठे, उद्योग, स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय संस्था यांना एकाच व्यासपीठावर आणून संशोधनाचे व्यापारीकरण आणि उद्योगाभिमुख विकासाला चालना देण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी नमूद केले.

प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी थेट संवाद साधण्याची तसेच आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देण्याची संधी या कार्यशाळेतून मिळणार असल्याचे

पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या माध्यमातून पुण्याला पुन्हा एकदा देशाच्या 'विचार नेतृत्वा'चे केंद्र बनविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यातील जागतिक दर्जाच्या संशोधन संस्था आणि वेगाने विकसित होत असलेली स्टार्टअप परिसंस्था यामुळे ज्ञान आणि उद्योग यांचा प्रभावी संगम घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. स्टार्टअप्सना संधी देण्यासाठी प्रशासकीय दृष्टिकोनात बदल आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी 'अश्युअर्ड फ्रेमवर्क'ची संकल्पना मांडली. तरुण उद्योजकांवर विश्वास ठेवून त्यांना प्रारंभीच संधी दिल्यास ते जागतिक स्तरावरील उद्योग उभारू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताकडे मोठी क्षमता असून आता त्या क्षमतेला गती देण्याची गरज आहे. भारतीय कल्पना, भारतीय गुंतवणूक आणि भारतीय प्रयत्नांतून निर्माण होणारी संपत्ती देशातच राहिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांच्या 'More from Less for More' या विचाराचा संदर्भ देत डॉ. माशेलकर यांनी तंत्रज्ञान सर्वसामान्यांसाठी परवडणारे आणि सुलभ करण्यावर भर दिला. आरोग्य क्षेत्रातील कमी खर्चातील निदान तंत्रज्ञानाची उदाहरणे देत त्यांनी समाजाभिमुख नवोपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

सांगून त्यांनी भारताला प्रगत उत्पादन, एरोस्पेस, संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील जागतिक केंद्र बनविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली

महाराष्ट्र देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १५ टक्के योगदान देत असून राज्यात ४० हजारांहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कार्यरत आहेत. राज्याचा खरा स्पर्धात्मक फायदा हा मानवी भांडवलात असून अभियंते, शास्त्रज्ञ आणि उद्योजकांच्या ज्ञानाचे आर्थिक मूल्यात रूपांतर करण्यास अशा उपक्रमांमुळे चालना मिळते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी भारताची ओळख नवोपक्रम घडविणाऱ्या राष्ट्राची असली पाहिजे, असे प्रतिपादन केले. संकल्पनेपासून ते व्यापारीकरणापर्यंतचा प्रवास सुलभ करण्यासाठी आवश्यक दुवे मजबूत करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 'कूस' सर्वोत्कृष्ट; अमेरिका, फ्रान्समध्येही मराठी लघुपटाचा झेंडा




पुणे (दैनिक संध्या) : प्रभात चित्र मंडळ, रोटरी क्लब ऑफ ठाणे एसेस आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चित्रभारती २०२६' लघुपट महोत्सवात डॉ. ज्ञानेश्वर जाधवर दिग्दर्शित 'कूस' (द वूम्ब) या लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपटाचा मान पटकावला. याचबरोबर डॉ. जाधवर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार, तर अभिनेत्री अनुया कळसकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने गौरविण्यात आले. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडलेल्या महोत्सवानंतर ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे खासदार नरेश म्हस्के, प्रभात चित्र मंडळाचे सचिव डॉ. संतोष पाठारे आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे श्रमजीवन, आरोग्यविषयक समस्या, मासिक पाळीशी संबंधित अडचणी आणि वाढत्या गर्भाशय काढण्याच्या घटनांचे वास्तववादी चित्रण 'कूस' या लघुपटातून करण्यात आले आहे. उचित मीडिया सर्व्हिसेस, पुणे निर्मित या लघुपटाचे निर्माते जीवराज महादेव चोले असून, कथा, पटकथा आणि दिग्दर्शन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांचे आहे, तर संवाद लेखनासाठी विठ्ठल काळे यांनी साथ केली आहे. या लघुपटात अनुया कळसकर, विठ्ठल नागनाथ काळे, वैशाली केंदळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे आणि जीवराज महादेव चोले यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. तर अरमान सय्यद आणि जानवी मोरे यांनी बालकलाकार म्हणून काम केले आहे.

### आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या किडनी व युरोलॉजी स्क्रीनिंग कॅम्पला प्रतिसाद




पुणे (दैनिक संध्या) : चिंचवड येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आलेला किडनी, युरिनरी आणि प्रोस्टेट स्क्रीनिंग कॅम्प नुकताच यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून कॅम्पदरम्यान १००० हून अधिक रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.किडनी व युरोलॉजी संबंधित आजारांचे लवकर निदान, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि जनजागृती या उद्देशाने हा विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत असलेल्या किडनी व मूत्रविकारांच्या समस्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.कॅम्पदरम्यान रुग्णांची तपासणी तज्ज्ञ युरोलॉजिस्ट, नेफ्रोलॉजिस्ट आणि अनुभवी वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अत्याधुनिक निदान सुविधा, त्वरित तपासणी प्रक्रिया आणि तज्ज्ञांचे सल्लामसलत यामुळे रुग्णांना योग्य मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमाबाबत बोलताना आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पामेश गुप्ता म्हणाले,"हा उपक्रम आमच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि लवकर निदान या संकल्पनेशी जोडलेला आहे. किडनी व युरोलॉजी आजारांमध्ये वेळेवर निदान केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते. नागरिकांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद हे आरोग्य जनजागृती वाढत असल्याचे सकारात्मक चिन्ह आहे." या कॅम्पमध्ये रुग्णांमध्ये आढळणाऱ्या विविध लक्षणांवर विशेष लक्ष देण्यात आले. यामध्ये मूत्रत्याग करताना वेदना किंवा अडचण, फेसाळ किंवा रक्तमिश्रित लघवी, पाठ किंवा कंबरेतील सतत वेदना, शरीरात सूज येणे, भूक कमी होणे, सतत थकवा जाणवणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे अशा लक्षणांचा समावेश होता. ही लक्षणे अनेकदा दुर्लक्षित केली जातात, मात्र ती किडनी किंवा युरोलॉजिकल आजारांची सुरुवातीची चिन्हे असू शकतात, असे तज्ज्ञांनी सांगितले.

## हिमालया बेबीकेअरची बाळांसाठी उन्हाळी काळजी मोहीम सुरू

पुणे (दै. संध्या)

■ उन्हाळ्यात बाळांची विशेष काळजी कशी घ्यावी यासाठी बहुभाषिक जनजागृती उपक्रम

हिमालया बेबीकेअरने उन्हाळ्यासाठी नवीन जनजागृती मोहीम सुरू केली असून, उन्हाळ्यात बाळांची योग्य काळजी कशी घ्यावी याबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. बाळांच्या आरामदायी आणि सौम्य संगोपनावर भर देणाऱ्या या उपक्रमात प्रथमच उन्हाळी काळजीचा एक सोपा आणि उपयुक्त दिनक्रम सादर करण्यात आला आहे. हा दिनक्रम बाळांना उन्हाळ्यात थंडावा, ताजेपणा आणि आनंद देण्यास मदत करतो. या मोहिमेचा मुख्य भाग म्हणजे एक मनोरंजक दृकश्राव्य चित्रफीत. या चित्रफितीत बाळे जणू




उन्हाळ्याविरोधात आंदोलन करताना दाखवली आहेत. "आम्हाला त्वचेवर पुरळ नकोत" आणि "घामापासून सुटका करा" अशा मागण्या करणारे फलक हातात घेऊन बाळे आपला त्रास व्यक्त करताना दिसतात. उन्हामुळे होणाऱ्या अस्वस्थतेविरोधात बाळांनीच मोर्चा काढल्याचे हे चित्रण अतिशय गोंडस आणि सहज समजणारे आहे. यानंतर कथानकात सकारात्मक बदल दिसून येतो. हिमालया बेबीकेअरच्या उन्हाळी काळजी दिनक्रमाचा अवलंब केल्यानंतर बाळांची चिडचिड आणि अस्वस्थता कमी होऊन ती अधिक शांत आणि आनंदी झाल्याचे दाखवण्यात आले आहे. हा सौम्य आणि सोपा दिनक्रम बाळांना आरामदायी अनुभव देतो. या उपक्रमातून आजच्या पालकांना एक महत्त्वाचा संदेश देण्यात आला आहे. उन्हाळ्यात बाळांची नाजूक त्वचा अधिक संवेदनशील बनते, मात्र नियमित आणि योग्य काळजी घेतल्यास अनेक समस्या टाळता येतात. "बाळांना उन्हाळ्यात थंड, ताजे आणि आनंदी ठेवा" या संदेशाद्वारे हिमालया बेबीकेअरने सुरक्षित, विश्वासार्ह आणि परिणामकारक बाळसंगोपन उत्पादने उपलब्ध करून देण्याची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.

याबाबत बोलताना हिमालया वेलनेसचे बाळसंगोपन विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले, "आमचा भर नेहमीच नव्या पिढीतील पालकांच्या बदलत्या गरजा समजून घेऊन त्यानुसार उपाय उपलब्ध करून देण्यावर असतो. आम्ही केवळ उत्पादने देत नाही, तर संपूर्ण आणि उपयुक्त मार्गदर्शनही देण्याचा प्रयत्न करतो. उन्हाळ्यात बाळांना अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या काळजीसाठी योग्य आणि नियमित दिनक्रम आवश्यक आहे.

## गुंतागुंतीच्या स्टॅगहॉर्न किडनी स्टोनची यशस्वी शस्त्रक्रिया

पुणे (दै. संध्या)

■ मूत्रपिंडाची कार्यक्षमता राखण्यात यश

मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे येथील युरोलॉजी विभागाने मोठा स्टॅगहॉर्न किडनी स्टोन, मूत्रपिंडाभोवती रक्तस्राव (पेरिनेफ्रिक हेमॅटोमा) आणि मधुमेह व उच्च रक्तदाब यांसारख्या सहव्याधींनी ग्रस्त असलेल्या 63 वर्षीय महिलेवर यशस्वी शस्त्रक्रिया करून तिची मूत्रपिंडाची कार्यक्षमता जपण्यात महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. या आव्हानात्मक शस्त्रक्रियेचे नेतृत्व मेडिकव्हर हॉस्पिटलचे कन्सल्टंट युरोलॉजिस्ट, अँड्रोलॉजिस्ट, लॅप्रोस्कोपिक आणि रेनल ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. सुमित चौधरी यांनी केले. सदर रुग्णाला मागील सहा महिन्यांपासून मूत्रपिंडातील खड्यांचा त्रास होता. त्याचबरोबर तिला मागील पाच वर्षांपासून मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास होता. सुरुवातीला अन्य रुग्णालयात उपचारादरम्यान डाव्या मूत्रपिंडामध्ये मोठा स्टॅगहॉर्न स्टोन आणि त्यासोबत पेरिनेफ्रिक हेमॅटोमा असल्याचे निदान झाले. रक्तस्रावाचा धोका जास्त असल्याने तेथे खडा काढण्याची शस्त्रक्रिया करता आली नाही आणि तात्पुरत्या स्वरूपात डीजे स्टेंट बसविण्यात आला. यानंतर रुग्णाला पुढील विशेष उपचारांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तपासणीत डाव्या मूत्रपिंडाचा आकार तुलनेने लहान असल्याचे आढळले. त्यामध्ये सुमारे 4 x 3 सेंमी आकाराचा मोठा स्टॅगहॉर्न स्टोन, अतिरिक्त 1 सेंमीचा खडा आणि 5 x 2 x 2 सेंमी आकाराचा पेरिनेफ्रिक हेमॅटोमा आढळून आला.

# विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिम यशस्वी करा

## मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण (एसआयआर) मोहीमेअंतर्गत मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, याबाबत नागरिकांना वस्तूनिष्ठ माहिती होण्याकरिता व्यापक स्वरुपात जनजागृती, शंकाचे निरसन, लोकप्रतिनिधींचा सहभाग, सामाजिक संस्था आदी घटकांना विश्वासात घेवून मतदार यादी अद्ययावत करावी. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना त्रास होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. एसआयआर मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी मिळून समन्वयाने कामे करावीत, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विशेष सखोल मतदार पुनरिक्षण (एसआयआर) मोहीमेबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, यांच्यासह मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

श्री. चोकलिंगम म्हणाले, एसआयआर मोहिमेच्या उद्देशाबाबत मुद्रित, इलेक्ट्रानिक, समाज माध्यम तसेच रेडिओद्वारे व्यापक स्वरुपात जनजनागृती करावी. एसआरच्या अनुषंगाने माहिती देण्याकरिता मदत कक्ष कार्यान्वित करा. नागरिकांच्या शंकांबाबत बैठक घेवून त्याचे निराकरण करावे, बैठकीत वस्तूस्थितीदर्शक माहिती त्यांच्यासमोर मांडावी. प्रशासनाने स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक आदी घटकांना सोबत घेवून काम करावे.

भारतीय नागरिकाबाबत सर्वोच्च न्यायलायाचे न्यायनिर्णय, भारतीय लोकप्रतिनिधी कायदा, भारतीय संविधानातील तरतुदींचा अभ्यास करुन काम करावे. एकही पात्र नागरिक मतदार यादीतून वगळण्यात येणार नाही, तसेच कोणत्या परिस्थितीत अपात्र नागरिक मतदार यादीत समावेश होणार नाही, मतदार यादीतील नावे खात्री करुनच कमी करावी. याद्दष्टीने सुक्ष्मनियोजन करुन काम करावे. महसूल विभागासोबतच आवश्यकतेप्रमाणे इतर विभागाची मनुष्यबळाची नियुक्ती करावी. मतदान केंद्रनिहाय उद्दिष्ट निश्चित करुन मतदार यादी मॅपिंगच्या कामाला गती द्यावी.




एसआयआर मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेण्यात येणार आहे. घरोघरी भेट देऊन पूर्वमुद्रित फॉर्मद्वारे मतदारांची माहिती पडताळणी केली जाणार आहेत. नाव, पत्ता, छायाचित्रे किंवा इतर तपशीलांमध्ये बदल असल्यास त्याची नोंद करता येणार आहे. तसेच पत्त्यावर उपस्थित नसलेले (अब्सेंट), स्थलांतरीत (शिफ्टेड), मयत (डेड) आणि डुप्लीकेट (एएसडीडी) प्रकारातील नोंदींची तपासणीही केली जाणार आहे.

सन २००२ ते २००४ मधील जुन्या मतदार याद्यांशी मॅपिंग उपलब्ध असल्यास अतिरिक्त कागदपत्रांची आवश्यकता भासणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट केले. शासकीय निवासस्थानामध्ये वासत्वय करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेवून पुढील कार्यवाही करावी.

श्री. डुडी म्हणाले, सन २००२ मध्ये जिल्ह्यात ४६ लाख ९ हजार १२७ इतके मतदार होते तर सन २०२६ मध्ये जिल्ह्यात ९० लाख ९० हजार ९७० मतदार आहेत. एसआयआर मोहीमेअंतर्गत मतदारांच्या नोंदींच्या अनुषंगाने घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहेत.

याकरिता जिल्ह्यातील सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. एसआयआर पुर्वतयारीच्या अनुषंगाने मॅपिंग, मनुष्यबळाची नियुक्ती, प्रशिक्षण, मतदार गणना फार्मची छपाई, सुनावणी व पडताळणी प्रकिया, आवश्यक ती पूर्वतयारी करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्री. डुडी यांनी यावेळी दिली.

## खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे



नासिकेत कृष्णकांत पानसरे
ज्येष्ठ पत्रकार, मुंबई

साने गुरुजी यांची आज ७६ वी पुण्यतिथी.साने गुरुजी यांनी मुंबईत ११ जून १९५० रोजी के.ई.एम. रुग्णालयात २१ झोपेच्या गोळ्याचे अतिसेवन करून आत्महत्या केली. माझी आई गांधीवादी कै.तरुलता कृष्णकांत राजेशिर्के- पानसरे ही साने गुरुजींच्या साहित्यावर प्रेम करणारी होती.तिच्या अप्रकाशित साहित्य व कविता यांचा खजिना माझ्याकडे आहे.माझी आई स्वर्गात गेल्यानंतर तिची कवितांची वही माझ्या वाचनात आली.त्यामध्ये तिने असे लिहिलेले होते की ज्या दिवशी साने गुरुजींनी आत्महत्या केली होती.त्याच दिवशी तिची आई म्हणजे माझी आजी कॅन्सरच्या आजाराने तिला सोडून गेली होती. याबाबत लिहिताना ती म्हणते की दोघेही बहिण भाऊ स्वर्गात एकमेकांना भेटले असतील. काय ही तिची भाबडी कल्पना. मी ही तरुणपणी वैफल्यग्रस्त जीवन जगत असताना तासनतास स्वतःला एका खोलीत कोंडून घेत असे पण ती मला कधी रागावली नाही.एवढच म्हणायची तू साने गुरुजींसारखी आत्महत्या केलेली मला आवडणार नाही.मग मी त्यापासून परावृत्त होत असे.पण मी माझ्या एकुलती एक मुलगी धरती. हिला समजावू शकलो नाही.ती वैफल्यग्रस्त जीवन जगत असताना मला नेहमी म्हणायची पप्पा मला आत्महत्या करावीशी वाटते.मी तिला नेहमी म्हणायचो की तूला मरण आले तरी ठिक.त्यातून तूला अपंगत्व आले तर तू काय करशील.मी तिला माझ्या आईने मला नेहमी दिलेला उपदेश सांगत असे.पण तिने माझे ऐकले नाही. आणि तिने मोठे धाडस केले.आणि ती मला या दुनियेतून सोडून गेली. आणि आयुष्यभराचे दु:ख आम्हा उभयतांना पती पत्नीना देऊन गेली. गुरुजींची आत्महत्येच्या निर्णयामागे वैयक्तिक दुःख आणि राजकीय सामाजिक निराशा ही कारणे असली तरी गांधीहत्येमुळे त्यांना मानसिक धक्का बसला होता.आणि त्यानंतर उसळलेल्या दंगलीची चिंता त्यांना होती. माझी गांधीवादी आईनेही महात्मा गांधी यांची हत्या झाल्यानंतर १० ते १२ दिवस अन्नपाणी सोडले होते.गांधीची हत्या ज्या दिवशी झाली तो शुक्रवार होता.हा दिवस मरेपर्यंत तिने उपवास केला.तीची ईच्छा होती की मला शुक्रवारी मरण यावे,ती १७ ऑगस्ट १९८९ रोजी शुक्रवार होता.या दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने मला सोडून गेली, माझ्या आईने गांधीचा शुक्रवार तर माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा बुधवार मरेपर्यंत उपवास केला.साने गुरुजी या नावाशी माझा नेहमी संबंध राहिला आहे.माझी पानसरे नावाची बिल्डिंग चिंचपोकळी येथील आर्थररोड नाक्यावरील साने गुरुजी मार्गावर आहे.त्यामुळे वयाच्या ३३ वर्षांपर्यंत घरचा पत्ता लिहिताना मी साने गुरुजी मार्ग असे लिहित असे.माझे प्राथमिक शिक्षण आर्थररोड नाक्यावरील मुंबई महानगर पालिकेच्या साने गुरुजी प्राथमिक शाळेत झाले याचा उल्लेख येथे करावसा वाटतो.आता जाणून घेऊ या साने गुरुजी यांची माहिती.साने गुरुजी यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे झाला.त्यांचे नाव पांडुरंग सदाशिव साने.आईचे नाव यशोदाबाई तर वडीलांचे नाव सदाशिव.साने गुरुजींची कर्मभूमी खान्देशची अमळनेर येथील.तेथील तत्वज्ञान मंदिर आणि प्रताप विद्यालयात त्यांनी अध्यापन केले.त्यांनी न्यू पूना कॉलेजमधून मराठी आणि संस्कृत विषयात एम.ए.पदवी पर्यंत शिक्षण घेतले होते.ते एक महाराष्ट्रातील एक थोर स्वातंत्र्यसेनानी, संवेदनशील साहित्यिक,शिक्षक आणि समाजसुधारक होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सहभाग होता.१९३० घ्या सविनय कायदे भंग चळवळीत त्यांनी भाग घेतला.त्यासाठी त्यांना अनेक वर्ष तुरुंगावास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी बहुतांश साहित्य लिहिले.धडपडणारी मुले, भारतीय संस्कृती,गोड गोष्टी,सुंदर पत्रे हि त्यांची प्रमुख पुस्तके.त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली.त्यातील बहुतांश पुस्तके मुलांसाठी आहेत. श्यामची आई सर्वात प्रसिद्ध व लोकप्रिय पुस्तक.संपादक, नाटककार,वक्ते, चित्रपट निर्माते आचार्य अत्रे यांनी त्यांच्यावर श्यामची आई चित्रपट बनविला. ज्याला१९५४ साली राष्ट्रीय पुरस्कारांच्या पहिल्या यादीत राष्ट्रपतींचे सुवर्ण पदक मिळाले. गुरुजींनी आईच्या स्मृती श्यामची आई मध्ये शब्दबद्ध केल्या आहेत. श्यामच्या आई मधील श्याम म्हणजे स्वतः साने गुरुजी होय.गुरुजींवर त्यांच्या आईच्या शिकविणूचा व संस्कारांचा मोठा प्रभाव होता. तरुणांमध्ये देशभक्ती आणि समाजसेवा रुजवावी यासाठी त्यांनी राष्ट्रसेवा दलाची स्थापना केली. आंतरभारती चळवळ सुरु केली. समतावादी विचार ते अस्पृश्यता निवारण आणि सर्वधर्मसमभावचे ते कट्टर समर्थक होते.त्यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी आणि मानवी मुल्यांसाठी सर्मपित केले. त्यांचा पत्री हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.या काव्यसंग्रहातील खरा तो एकची धर्म.जगाला प्रेम अर्पावे. आजही हि कविता महाराष्ट्रातील शाळांमध्ये प्रार्थना म्हणून गायली जाते.आजच्या मोबाईलच्या युगात प्रत्येक आईवडीलांनी वेळ काढून लहान मुलांना साने गुरुजींचे साहित्य वाचून दाखवली पाहिजे असे मनोमन वाटते.गुरुजींना स्मृती दिनानिमित्त भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इलेक्ट्रिक वाहन वापराचे बारामती हे उदयोन्मुख केंद्र

बारामती (दैनिक संध्या) : ऑयलर मोटर्सने नुकताच बारामतीमध्ये ग्राहक मेळावा आयोजित केला होता.ग्राहक मेळाव्यात, ऑयलर मोटर्सचे संस्थापक आणि सीईओ सौरभ कुमार यांच्यासह स्थानिक नेते व मान्यवर उपस्थित होते. त्यांनी शहरातील ईव्ही वाहनधारकांचा सत्कार केला आणि बारामतीने उदयोन्मुख ईव्ही शहर म्हणून मिळवलेल्या नावलौकिकाबद्दल अभिनंदन केले. अनेक ग्राहक आणि मान्यवरांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला आणखी चालना देण्याचा संकल्प केला. जागतिक पर्यावरण दिनी, गेल्या आठवड्यात, महाराष्ट्रात नावाजलेले दूध शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारामतीने इलेक्ट्रिक वाहन वापराचे उदयोन्मुख केंद्र म्हणून आपली वाटचाल अधोरेखित केली. स्थानिक व्यावसायिक वाहनधारक डिझेल, पेट्रोल आणि सीएनजीकडून इलेक्ट्रिक वाहनांकडे टप्प्याटप्प्याने वळत असून वापर झपाट्याने वाढला आहे. सध्या बारामतीच्या रस्त्यांवर १२५ हून अधिक ऑयलर इलेक्ट्रिक वाहने धावत आहेत. सर्वांत मोठे आकर्षण ठरले आहे ते म्हणजे कमी वाहतूक खर्च. पूर्वी डिझेल आणि सीएनजीवर महिन्याला ₹४०,०००–५०,००० खर्च करणाऱ्या वाहनधारकांच्या मते इलेक्ट्रिक वाहनांमुळे हा खर्च ₹३,०००–५,००० पर्यंत खाली आला आहे. इंधनावर चालणाऱ्या वाहनांच्या तुलनेत असलेली समान खरेदी किंमत आणि विश्वासार्ह सेवा यांच्या जोडीने या बचतीमुळे वापरात लक्षणीय वाढ झाली आहे.

### राज्यातील कृषी विद्यापीठांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी; 3,723 पदांना मान्यता

मुंबई (दैनिक संध्या) : "राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कृषी विद्यापीठांच्या अ आणि ब संवर्गातील एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे. २००३ नंतर म्हणजेच २३ वर्षांनी नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यापीठांमधील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक परिणामकारक होईल, संशोधन व अध्यापनाच्या गुणवत्तेत वाढ होईल तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत अधिक वेगाने पोहोचविण्यास मदत मिळेल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. कृषी व पदुम विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, नियमित ३,६११ पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येणारी ११२ पदे अशा एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी; डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला; डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार आहे.

### वृध्दाला मारहाण, परप्रांतीय चालकावर गुन्हा दाखल

ठाणे (दैनिक संध्या) : ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पीटल जवळ वृद्धाला मारहाण करणाऱ्या परप्रांतीय चालकावर ३०७ कलमाअंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना दिलेत. काल संध्याकाळी रस्त्यावर थुंकणाऱ्या परप्रांतीय चालकाला एका वृद्धाने जाब विचारल्यानंतर या चालकाने खाली उतरून या वृद्धाला बेदम मारहाण केली होती. यावेळी या परप्रांतीय चालकाने या वृद्ध व्यक्तीला मारण्यासाठी हातात दगड घेतल्याचेही स्पष्टपणे दिसत होते. अशाप्रकारे घाण केल्याचे लक्षात आणून दिल्यावरही जाब विचारणाऱ्याला गंभीर मारहाण होणार असेल तर ते कदापी खपवून घेतले जाणार नाही. या घटनेत सदर वृद्धाला गंभीर दुखापत झाली असून त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. या घटनेचा व्हिडीओ वायरल झाल्यानंतर त्याची तत्काळ दखल घेत स्थानिक शिवसैनिकांनी या चालकाला शोधून अद्दल घडवून त्याला वर्तक नगर पोलीस स्थानकात आणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. मात्र ही घटना समजताच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन परप्रांतीय चालकावर हत्येचा प्रयत्न करण्याचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना दिले आहेत.

# जॅकी दादांच्या उपस्थितीने विट्याची वृक्षचळवळ जागतिक पातळीवर

**विटाम(दै. संध्या) :**

"फूल दिले की फूलच मिळते, दगड दिला की दगडच मिळतो. त्यामुळे कुणी टीका केली तर शांत राहायचे. कुणाचे पाय कापून आपण उंच होणार नाही," असा मोलाचा संदेश ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी दिला. गार्डी-घानवडच्या माळावर वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत साडेचार हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी त्यांच्या हस्ते या लोकचळवळीचा शुभारंभ झाला. यावेळी बोलताना जॅकी श्रॉफ म्हणाले, "खानापूर-आटपाडीचे आमदार सुहास बाबर हे पिंपळाच्या झाडाप्रमाणे सळसळत्या



उत्साहाचे व्यक्तिमत्त्व आहे. अशा नेतृत्वाला वाढविण्याची, जपण्याची आणि बळ देण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे."

"केवळ बोलणारे आणि प्रत्यक्ष कृती करणारे यांच्यात फरक असतो. सुहास बाबर हे कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करणारे लोकप्रतिनिधी आहेत," असे सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. पृथ्वी ही आपली आई असून तिच्या रक्षणासाठी प्रत्येकाने झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार सुहास बाबर यांनी ही कोणत्याही राजकीय पक्षाची नव्हे, तर समाजाची चळवळ असल्याचे सांगितले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मताधिक्याइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला असून पुढील दोन वर्षांत ७८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे त्यांनी सांगितले. जॅकी श्रॉफ यांच्या सहभागामुळे या उपक्रमाला देशव्यापी ओळख मिळेल आणि विट्यातून सुरू झालेली ही पर्यावरण चळवळ जगभर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा भोसले, नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश्वर टोम्पे, उपविभागीय पोलीस अधिकारी विपुल पाटील, गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे, उपसभापती सुहास शिंदे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि वृक्षलागवड मोहिमेचे कार्यकर्ते उपस्थित होते.


#### जॅकी दादांच्या साधेपणाने आमदार भारावले

"मी खूप जमिनीवर राहून काम करतो असे मला वाटायचे; मात्र जॅकी दादांना भेटल्यानंतर माझा हा समज दूर झाला," असे आमदार सुहास बाबर म्हणाले. यावेळी सौ. सोनिया बाबर यांनी औक्षण करून जॅकी श्रॉफ यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी बाजरीची भाकरी, तूप, गूळ आणि मीठ असा साधा नाश्ता केला. "एवढा साधा, विनम्र आणि मनमिळावू माणूस मी आजवर पाहिला नाही," असे गौरवोद्गार आमदार बाबर यांनी काढले.

## मेटाने भारतात एआय-सक्षम डेटा सेंटरसाठी रिलायन्ससोबत सहयोग केला

**मुंबई (दै. संध्या) :**

मेटा आणि रिलायन्स इंडस्ट्रीजने आज भारतातील एआय-सक्षम डेटा सेंटरच्या करारासह आमच्या धोरणात्मक सहयोगाच्या महत्त्वपूर्ण विस्ताराची घोषणा केली. जामनगर, गुजरात येथे असलेली ही गुंतवणूक भारतातील मेटाच्या दृढ कटिबद्धतेला सादर करते, जी जागतिक स्तरावर आमच्या सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या समुदायाला वैयक्तिक सुपरइंटेलिजन्स प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेली उत्पादने आणि एआय क्षमतांना सक्षम करणारी पायाभूत सुविधा आणेल. या कराराचा भाग म्हणून, रिलायन्स १६८ मेगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर उभारणार आहे, जे मेटा भाड्याने घेईल आणि भविष्यात ते वाढवण्याचे पर्यायही उपलब्ध असतील. "भारतातील आमचे पहिले एआय-सक्षम डेटा सेंटर उभारण्यासाठी रिलायन्ससोबत काम करण्याचा आम्हाला अभिमान आहे. जामनगरमधील ही जागतिक दर्जाची सुविधा आम्हाला जागतिक




स्तरावर आमच्या एआय पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यास मदत करेल आणि त्याच वेळी भारताच्या अर्थव्यवस्थेतील आमची दीर्घकालीन गुंतवणूक अधिक दृढ करेल," असे मेटाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मार्क झुकरबर्ग म्हणाले. जगभरातील अब्जावधी व्यक्तींना सेवा देणाऱ्या आमच्या तंत्रज्ञान, सेवा आणि एआय महत्त्वाकांक्षांना पाठिंबा देण्यासाठी मेटा आपल्या क्षमतांचा विस्तार करण्यासाठी आक्रमकपणे गुंतवणूक करत आहे. भारताची वेगाने वाढणारी तंत्रज्ञान-केंद्रित डिजिटल अर्थव्यवस्था, व्यापक ग्राहक संख्या आणि रिलायन्ससोबत आमच्या सहयोगाची ताकद यामुळे भारत गुंतवणुकीसाठी आदर्श ठिकाण बनले आहे.

## विक्रीपूर्वीच खुल्या परीक्षणासाठी नवे भ्रमणध्वनी; एआय प्लसचा अनोखा उपक्रम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतीय भ्रमणध्वनी क्षेत्रात प्रथमच असा उपक्रम राबविताना एआय प्लसने आपल्या आगामी नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो या भ्रमणध्वनी संचांची विक्री सुरू करण्यापूर्वीच देशभरातील तंत्रज्ञान अभ्यासक, वार्ताहर, आशय निर्माते आणि तंत्रज्ञान समुदायातील सदस्यांना परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. या परीक्षणावर कोणतेही बंधन, अट अथवा पूर्वनियोजित संदेश नसणार आहेत.

उत्पादन सादरीकरणाच्या पारंपरिक पद्धतींपासून वेगळा मार्ग स्वीकारत एआय प्लसने प्रसिद्धीपूर्वी संवाद, विक्रीपूर्वी अभिप्राय आणि विपणनापूर्वी ग्राहकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत बोलताना एआय प्लस स्मार्टफोनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीजचे संस्थापक माधव शेठ म्हणाले, "बहुतेक उत्पादन सादरीकरणे ही काळजीपूर्वक नियंत्रित माहितीभोवती उभारली जातात. मात्र आम्ही ग्राहकांच्या हिताला अग्रक्रम




परीक्षकांना उपकरणे मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यांचे मत स्वतंत्रपणे आणि कोणत्याही दबावाशिवाय प्रसिद्ध करता येणार आहे. सकारात्मक तसेच टीकात्मक अभिप्रायाचेही स्वागत करण्यात येणार असून पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण सुधारणांप्रती असलेल्या बांधिलकीचा तो भाग असेल. सर्व अभिप्राय ब्रँडच्या संकेतस्थळावर तत्काळ उपलब्ध करून दिले जाणार आहेत. एआय प्लसच्या मते, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि ग्राहकांचे म्हणणे ऐकण्याची तयारी या तत्त्वांवरच तंत्रज्ञानाचे भविष्य उभे राहणार आहे.

नोव्हा मालिकेतील पुढील विस्तार म्हणून सादर होणारे नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो हे संच नोव्हा २ अल्ट्रा या उपकरणाखालील श्रेणीत स्थान मिळवतील. अधिकाधिक ग्राहकांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविणे तसेच ते अधिक सुलभ, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनविणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

देत आहोत. आम्हाला केवळ स्तुती नको आहे, तर ग्राहकांच्या फायद्यासाठी निःपक्षपाती आणि प्रामाणिक अभिप्राय हवा आहे."

या उपक्रमांतर्गत परीक्षणासाठी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे, पूर्वनिर्धारित सूचना किंवा नियोजित अनुभव दिले जाणार नाहीत. विशेष म्हणजे, परीक्षकांना आपले मत व्यक्त करण्यासाठी सात दिवसांचा कालावधी दिल्यानंतरच हे संच विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येणार आहेत.

भ्रमणध्वनी संचाच्या रचना, कार्यक्षमता, छायाचित्रण क्षमता, बॅटरीचा वापरकाल, माहिती हस्तांतरण, विश्वासार्हता आणि एकूण वापर अनुभव अशा सर्व बाबींची कसून चाचणी घेण्याचे आवाहन परीक्षकांना करण्यात आले आहे.

माधव शेठ पुढे म्हणाले, "एक नवोदित ब्रँड म्हणून आम्ही अजूनही शिकत आहोत, सुधारणा करत आहोत आणि ग्राहकांचा विश्वास संपादन करत आहोत. आमच्याकडून काही त्रुटी राहिल्या असतील, तर ग्राहकांनी पैसे खर्च करण्यापूर्वी त्या त्यांना स्वतंत्र परीक्षणांतून समजणे अधिक योग्य आहे. त्यामुळे अभिप्रायाची ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो विक्रीसाठी उपलब्ध होणार नाहीत."

## बिशप स्कूलचा विद्यार्थी असल्याचा अभिमान : डॉ. सायरस पूनावाला

- द बिशप स्कूलच्या नवीन शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन
- डॉ. सायरस पूनावाला आणि अदार पूनावाला यांचा गौरव

**पुणे (दै. संध्या) :**

"बिशप स्कूलने मला केवळ शिक्षण दिले नाही, तर माझ्या संपूर्ण आयुष्याचा भक्कम पाया घातला. आज मी जे काही आहे, त्यामागे या शाळेचे मोठे योगदान आहे. त्यामुळे बिशप स्कूलचा माजी विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. शाळेच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारची मदत करण्यास मी कायम तयार आहे," असे प्रतिपादन सिरम इन्स्टिट्यूट ऑफ



इंडियाचे संस्थापक व पद्मभूषण डॉ. सायरस पूनावाला यांनी केले.

कॅम्प परिसरातील द बिशप स्कूलच्या नव्या शैक्षणिक इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शाळेचे प्राचार्य व मानद सचिव शेन मॅकफर्सन, बिशप एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रुडोल्फ वूडमन, डॉ. पूनावाला यांचे नातू डेरीयस पूनावाला, मुख्याध्यापिका मयुरा बारसे तसेच शाळेचे पदाधिकारी, शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक आणि मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेली ही नवीन इमारत प्रतिष्ठित माजी विद्यार्थी डॉ. सायरस एस. पूनावाला आणि अदार सी. पूनावाला यांच्या सहकार्याने साकारण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे संस्थेच्या विकासाला महत्त्वपूर्ण गती मिळाली असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमात डॉ. सायरस एस. पूनावाला आणि अदार सी. पूनावाला यांचा नवीन इमारतीच्या उभारणीत दिलेल्या योगदानाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. बिशप एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रुडोल्फ वूडमन आणि प्रशासकीय मंडळाच्या सदस्यांच्या हस्ते त्यांना रौप्य फलक प्रदान करून गौरविण्यात आले.

डॉ. पूनावाला म्हणाले, "जेव्हा जेव्हा मी या शाळेत येतो, तेव्हा जुन्या आठवणींमध्ये हरवून जातो. १९४९ ते १९५८ या कालावधीत मी येथे शिक्षण घेतले. त्या काळातील अनेक प्रसंग आजही माझ्या स्मरणात आहेत. एकेकाळी या शाळेत खोडकर विद्यार्थी म्हणून वावरणारा मी, आज प्रमुख पाहुणा म्हणून याच शाळेत उपस्थित आहे, यावर माझाच विश्वास बसत नाही.

## ब्लू रिबँड जिन नव्या आधुनिक अवतारात

BLUE RIBAND GIN

**पुणे (दै. संध्या) :**

ब्लू रिबँड जिनने आपल्या नव्या आकर्षक रूपाचे अनावरण केले असून, भारतातील सर्वाधिक प्रतिष्ठित जिन ब्रँडपैकी एकाला नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी नव्याने सादर केले आहे. नव्या पॅकेजिंगमुळे ब्रँडला आधुनिक आणि प्रीमियम ओळख मिळाली आहे, तर त्याचा विश्वासार्ह स्वाद आणि समृद्ध वारसा कायम ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे ब्लू रिबँड जिन अनेक दशकांपासून ग्राहकांची पसंती ठरली आहे.

हा बदल विकसित होत असलेल्या बाजारपेठेत सुसंगत राहण्याची, शेल्फवरील आकर्षकता वाढवण्याची आणि दीर्घकाळापासून ब्रँडशी जोडलेल्या ग्राहकांसोबत तसेच आधुनिक जिन पसंत करणाऱ्या नव्या ग्राहकांसोबत अधिक मजबूत नाते निर्माण करण्याची ब्लू रिबँड जिनची वचनबद्धता दर्शवतो.

या लॉन्चबाबत बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर - मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, "या नव्या ओळखीमुळे ब्लू रिबँड एका नव्या पर्वात प्रवेश करत आहे, जे परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर समतोल साधते. नव्या पॅकेजिंगची रचना ब्रँडची आधुनिक आकर्षकता वाढवण्यासाठी करण्यात आली आहे, तसेच ग्राहकांना आवडणारा विश्वास, परिचित अनुभव आणि चवीचा दर्जा कायम ठेवण्यात आला आहे. हा बदल इनब्रू बेव्हरेजेसच्या पोर्टफोलिओला अधिक प्रीमियम आणि मजबूत बनवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. आधुनिकता आणि ग्राहक-केंद्रित नवकल्पनांच्या माध्यमातून हा ब्रँड आपल्या निष्ठावान ग्राहकांबरोबरच प्रीमियम जिन अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीलाही आकर्षित करेल."

नव्या पॅकेजिंगसह ब्लू रिबँड जिन आता महाराष्ट्रभर ७५० मि.ली., १८० मि.ली. आणि ९० मि.ली. या पॅक साइजमध्ये उपलब्ध आहे.

## मॅनेजमेंट बायआऊटची प्रक्रिया पूर्ण

चेन्नई (दै. संध्या) : आघाडीच्या रेव्हेन्यू सायकल मॅनेजमेंट, रिस्क ॲडजस्टमेंट आरि हेल्थकेअर टेक्नोलॉजी कंपनी असलेल्या ईसीएलएटी हेल्थ सोल्युशन्स ने गल्फ कॅपिटल कडून मॅनेजमेंट बायआऊट (एमबीओ) ची प्रक्रिया पूर्ण केली.गल्फ कॅपिटल ही जीसीसी ते आशिया पर्यंत गुंतवणूक करणाऱ्या सर्वांत मोठ्या व सक्रीय प्रा.इक्विटी कंपन्यांपैकी एक आहे.या व्यवहारामुळे एका अत्यंत यशस्वी भागीदारीची सांगता होत असून ईसीएलएटीची पूर्ण मालकी पुन्हा तिच्या संस्थापक व व्यवस्थापन टीमकडे सोपवली जात आहे.

## 'विशेष अभय योजने'ला मुदतवाढ देण्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांचे निर्देश

पुणे (दै. संध्या) : राज्यातील सिंधी विस्थापितांच्या निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे फ्री-होल्ड (मुक्तहस्त) करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'विशेष अभय योजना-२०२५' अंतर्गत अनेक प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याची गंभीर दखल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करावी तसेच योजनेच्या मुदतवाढीबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सिंधी समाज संघटनेचे महाराष्ट्र मुख्य समन्वयक नानकराम नेभनाणी यांच्या निवेदनांच्या अनुषंगाने मंत्रालयात आयोजित बैठकीत सिंधी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यात आला.

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळविण्यात येते की संपत केरभाऊ मुळे यांचे ११-०२-२०२४ ला निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले वाहन हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर प्लस MH 14 CQ 7124 हे वाहन त्यांचे कायदेशीर वारस म्हणून पत्नी सुशीला संपत मुळे यांच्या नावावर करण्यात येणार आहे .याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास १० दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ ) कार्यालयात कळवावे अन्यथा सदर वाहन वारसाच्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER No.NTC/2026-27/11**

| SR. NO | SECTION / Rfx NO. | TENDER SPECIFICATION | ESTIMATE RS. EMD RS. |
|---|---|---|---|
| 1. | NTC<br>3000069605 | Bi-annual work contract for catering services manpower (fixed charges) & Variable Charges for Catering services for Mess at Nashik Training Centre, MSPGCL, Eklahare, Nashik through Open tender. | Rs.1,45,16,985.44 /-<br>Rs.1,48,669.85 /- |

Cost of Each Tender: -Rs.1180/- , Pl. visit at: https://eprocurement.mahagenco.in for more information & updates.

Superintending Engineer,
NTC

## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला पुणे - ४११ ००१ यांचे कार्यालय
ई मेल पत्ता - northpune.ee@mahapwd.gov.in — दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५

**ई-निविदा सूचना क्रमांक ६ सन २०२६-२०२७ (ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे ४११ ००१** (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता **ब-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

ई-निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर **htpp://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| काम क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत रूपये |
|---|---|---|
| १ | मौजे कल्हाट येथे करवंदेवस्ती ते दलितवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधणे ता. मावळ जि.पुणे | रु. ५०,५९,३१५/- |
| २ | अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे येथील दलितवस्ती रोडवर शिंदेवस्ती येथे ओढ्यावर साकव बांधणे ता. आंबेगाव जि.पुणे. | रु. ६०,८०,३००/- |
| ३ | लोणावळा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीची विविक्षीत दुरुस्ती करणे ता. मावळ जि. पुणे (छत गळती दुरुस्ती, बाहेरील वॉटरप्रुफ, रंगकाम, इमारतीमधील रंगकाम इ.) | रु. ५४,३७,५८२/- |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| काम क्र. | टप्पा | पासून दिनांक व वेळ | पर्यंत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा ऑनलाईन विक्री व स्विकृती कालावधी | दि. १६.०६.२०२६ सकाळी १०.०० पासून | दि. २३.०६.२०२६ सकाळी १८.१५ पासून |
| २ | तांत्रिक व आर्थिक ई निविदा ऑनलाईन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, पुणे यांचे कार्यालयात दिनांक २५.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) | |

संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) www.mahapwd. gov.in (फक्त निविदा सूचना)
२) htpp://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे कार्यालयातील सूचना फलक

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग,
पुणे ४११ ००१ करिता

विमाका/पुणे/जाहि./४२/२०२६-२७

# पिंपरी-चिंचवडमध्ये जाहिरात धोरणाचा अभाव

## महापालिकेला कोट्यवधींचे नुकसान; किऑक्स, गॅण्ट्री व उड्डाणपुलांवरील फुकट जाहिरातींमुळे महसुली तोटा

### धोरण रखडल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात विद्युत दिव्याच्या खांबांवर रंगीबेरंगी किऑक्स, रस्त्यांवरील गॅण्ट्री (दिशादर्शक लोखंडी कमान) तसेच, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गात असंख्य जाहिराती लावल्या जातात. त्या जाहिरातीबाबतचे अद्याप निश्चित धोरण नसल्याने महापालिकेस त्यातून काहीच उत्पन्न मिळत नसल्याचे धक्कादायक चित्र आहे. राजकीय नेते, पदाधिकारी, नगरसेवक, बांधकाम व्यावसायिक व इतर मंडळी त्या ठिकाणी फुकटची जाहिरात लावून आपली प्रसिद्धी तसेच, व्यावसायिक हेतू साध्य करून घेत आहेत. मात्र, धोरण ठरत नसल्याने तसेच, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे महापालिकेची झोळी रिकामीच आहे.

पिंपरी-चिंचवड शहर 181 किलोमीटर क्षेत्रफळात वसले आहे. शहरात महापालिकेची तब्बल 1 लाख 14 हजार 462 विद्युत दिव्यांचे खांब आहेत. त्यातील अनेक खांबांवर किऑक्स लावून बिनभोबाट जाहिराती केल्या जात आहेत. त्याला महापालिका प्रशासनाकडून कसलाही लगाम नाही. शेकडो खांबांवर किऑक्स लावून बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, क्लासेस आपली फुकटची जाहिरात करून घेतात. अशा प्रकारे किऑक्स लावण्यासाठी ठराविक जाहिरात एजन्सी शहरात कार्यरत आहेत. त्यातून महापालिकेस कोणतेही शुल्क मिळत नाही. ते सर्व उत्पन्न खासगी एजन्सीच्या खिशात जात आहे. किऑक्स लावण्यानंतर अनेक दिवसांनंतर संबंधित क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाकडून कारवाई केली जाते. मात्र, तोपर्यंत त्याच्या जाहिरातीचा हेतू साध्य झालेला असतो.

याच प्रकारे शहरातील मुख्य रस्त्यांवरील गॅण्टीवर फुटकची जाहिरात केली जात आहे. त्यावर विशेष करून राजकीय पदाधिकारी, नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या जाहिरातीचे प्रमाण



अधिक असते. वाढदिवस, सण, उत्सव, स्पर्धा, महापुरुषांच्या जयंतीनिमित्तचे फ्लेक्स त्या ठिकाणी मोठ्या संख्येने लावले जातात. मात्र, त्या जाहिरातीतूनही महापालिकेस काहीच उत्पन्न मिळत नाही. शहरातील 18 मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर एकूण 97 गॅन्ट्री आहेत.

शहरात महापालिकेच्या असंख्य उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग आहेत. त्याची संख्या 80 आहे. तेथे जाहिरात लावण्याबाबत महापालिकेचे अद्याप कोणतेही धोरण नाही. त्यामुळे तेथे शेकडो जाहिराती लावल्या जातात. जाहिरात एजन्सी, नेतेमंडळी, सामाजिक कार्यकर्ते त्या ठिकाणी फुकटच्या जाहिराती लावत आहेत. त्या माध्यमातूनही महापालिकेसही काहीच तिजोरीत काहीच भर पडत नाही.

या सर्व प्रकारामुळे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. मात्र, खासगी जाहिराती एजन्सी, बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, राजकीय नेतेमंडळी, पदाधिकारी व कार्यकर्ते फुकटची जाहिरातबाजी करत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, त्या बाबत महापालिका प्रशासन गंभीर नसल्याचे दिसत आहे.

विद्युत खांबांवर किऑक्स लावणे. रस्त्यावरील गॅन्ट्रीवर जाहिराती लावणे. उड्डाणपूल आणि भुयारी मार्गात जाहिरात लावणे यासाठी महापालिकेकडून निविदाप्रक्रिया राबविण्यास चालढकल केली जात आहे. प्रशासनाकडून वेळकाढूपणा केला जात असल्याने तसेच, निविदाप्रक्रियेत वारंवार त्रुटी काढल्या जात असल्याने ती निविदाप्रक्रिया अनेक वर्षांपासून अडकून पडली आहे. परिणामी, महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे.

शहरातील बसथांबे, डीपी बॉक्स, सीमाभिंती, प्रवेशद्वार, दिशादर्शक फलक, झाडांवर विनापरवाना पोस्टर लावण्यात येतात. त्यात जागा विक्री, नोकरीविषयक, वैद्यकीय उपचार, सदनिका भाड्याने देणे, क्लासेस, संगणक प्रशिक्षण, अभ्यासक्रम, सर्कस, चित्रपट, सेवा आदी संदर्भातील जाहिराती असतात. त्या पोस्टरमुळे शहर विद्रुप दिसते. कश्याही प्रकारे पोस्टर चिकटवल्याने स्वच्छता वाढते. अशी पोस्टर लावण्यावर ठोस कारवाई होत नसल्याने विनापरवाना पोस्टर लावण्याची संख्या काही कमी होत नसल्याचे चित्र आहे.

### स्थायी समितीच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष कार्यवाही

विद्युत खांबांवर किऑक्स लावणे. रस्त्यावरील गॅण्ट्रीवर जाहिराती लावणे. उड्डाणपूल आणि भुयारी मार्गात जाहिरात लावणे यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून क्षेत्रीय कार्यालयानुसार निविदाप्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. त्याला जाहिरात एजन्सींची प्रतिसाद मिळाला आहे. स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर त्यासंदर्भातील प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल. त्यातून महापालिकेस दरवर्षी भरघोस उत्पन्न मिळणार आहे. तसेच, शहरभरात विनापरवाना लावण्यात येणाऱ्या जाहिराती, फ्लेक्स, किऑक्सवर नियमितपणे कारवाई केली जात आहे. दंडात्मक कारवाई करून फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, असे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.

---




# सर्व शाळांमध्ये 'सिव्हिक सेन्स' विषयाचा सक्तीचा तास सुरू करा

### नगरसेविका स्नेहा कलाटे यांची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी दर आठवड्याला "सिव्हिक सेन्स" (नागरिक शिस्त व सामाजिक जबाबदारी) या विषयावर विशेष सक्तीचा तास सुरू करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

देशभरात राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती मोहिमांमुळे नागरिकांमध्ये स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीबाबत जागरूकता वाढत असली, तरी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, रस्त्यावर थुंकणे आणि ध्वनीप्रदूषण करणे यांसारख्या समस्या अद्यापही मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच नागरिक शिस्त आणि सामाजिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे आवश्यक असल्याचे कलाटे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

शाळांमध्ये 'सिव्हिक सेन्स' विषयावर नियमित तास घेतल्यास विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक स्वच्छता, वाहतूक नियमांचे पालन, पर्यावरण संवर्धन, सामाजिक शिस्त आणि सार्वजनिक संपत्तीचे जतन याबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित होईल. तसेच जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

"आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात अधिक शिस्तबद्ध, सजग आणि सुसंस्कृत समाज घडण्यास मदत होईल," असेही त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या शिक्षण विभागाला आवश्यक त्या सूचना देऊन सर्व शाळांमध्ये 'सिव्हिक सेन्स' विषयाचा विशेष तास सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

---

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला आता नवीन मुहूर्त

**पिंपरी (दै. संध्या)**


हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावर पहिल्या टप्प्यात १५ जुलैपर्यंत मेट्रो धावेल. हिंजवडी ते बाणेरदरम्यान १२ स्थानकांचा समावेश आहे. संपूर्ण मार्गिका डिसेंबरअखेरपर्यंत कार्यान्वित होईल, अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त अभिजीत चौधरी यांनी दिली. मेट्रो संदर्भातील उर्वरित कामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होतील, असेही त्यांनी सांगितले. शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो ही पुण्यातील तिसरी मेट्रो मार्गिका आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड कंपनीसमवेत राबविण्यात येत आहे. ही मार्गिका सुरु करण्याचे आठ मुहूर्त हुकले आहेत. याबाबतची माहिती देताना आयुक्त चौधरी म्हणाले, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड कंपनीला ३० जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. पावसाळ्यात काही अडचणी येऊ शकतात. त्यामुळे १५ जुलैपर्यंत १२ स्थानकांपर्यंत मेट्रो सुरु करण्याचे नियोजन आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणीसाठी १५ ते २० जून दरम्यानची तारीख देण्यात आली आहे. ग्राह्य कारणांमुळे मुदतवाढ देण्यात येत आहे. जोपर्यंत मुदतवाढ आहे, तोपर्यंत विलंब दंड आकारता येणार नाही. पहिल्या टप्प्यातील कामानंतर चार स्थानके करण्यात येतील. हे काम पूर्ण झाल्यानंतर टप्प्या-टप्प्याने सात स्थानकांचे काम पूर्ण केले जाईल.

---

# चिखली-कुदळवाडी दगडफेक प्रकरणात ३६ जणांना अटक

### सीसीटीव्ही व ड्रोन फुटेजच्या आधारे शोध मोहीम तीव्र

**पिंपरी (दै. संध्या)**



चिखली-कुदळवाडी परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांवरील कारवाई दरम्यान पोलिसांवर झालेल्या दगडफेक प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कठोर भूमिका घेतली असून आतापर्यंत ३६ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही, ड्रोन फुटेज आणि शासकीय कॅमेऱ्यांमधील चित्रफितींची बारकाईने तपासणी सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली परिसरातील ११ अनधिकृत धार्मिक बांधकामांवर कारवाई केली होती. या कारवाई दरम्यान परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, कारवाई सुरू असताना काही समाजकंटकांनी पोलिसांवर दगडफेक करत कायदा व सुव्यवस्थेला आव्हान दिले. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणत गुन्हा दाखल केला आणि आरोपींच्या अटकेची मोहीम सुरू केली.

घटनेचा तपास अधिक प्रभावीपणे करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज, ड्रोनद्वारे चित्रीत दृश्ये तसेच पोलिसांच्या शासकीय कॅमेऱ्यांमधील चित्रणाची तपासणी करून संशयितांची ओळख पटवली जात आहे. पोलिसांच्या विशेष पथकांकडून आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू असून आणखी अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याबाबत माहिती देताना अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड म्हणाले की, उपलब्ध व्हिडिओ फुटेजच्या आधारे प्रत्येक आरोपीची अचूक ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. पोलिसांवर हल्ला करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या कक्षेबाहेर राहू दिले जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, परिसरात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



# पिंपरी-चिंचवडमध्ये टोईंग कारवाईसाठी नवे कडक नियम; गणवेश व ओळखपत्र अनिवार्य

- गैरवर्तनाच्या तक्रारींनंतर वाहतूक विभागाचा निर्णय
- नियमभंग झाल्यास अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित

पिंपरी (दैनिक संध्या) : टोईंग व्हॅनवरील कर्मचाऱ्यांची अरेरावी, उद्धट वर्तन तसेच गणवेश आणि ओळखपत्राविना सुरू असलेल्या कामकाजाच्या तक्रारींची दखल घेत वाहतूक विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. नवे पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी पदभार स्वीकारल्यानंतर टोईंग कारवाईतील शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी कर्मचाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देत कडक आदेश जारी केले आहेत. शहरात वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि 'नो पार्किंग'मधील वाहनांवर कारवाई करण्यासाठी टोईंग व्हॅनची मदत घेतली जाते. मात्र, वाहन उचलताना काही कर्मचाऱ्यांकडून वाहनचालकांशी अरेरावीची भाषा वापरणे, योग्य माहिती न देणे, उर्मटपणे बोलणे तसेच गणवेश आणि ओळखपत्राशिवाय काम करणे अशा तक्रारी वेळोवेळी समोर येत होत्या. याबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींची विक्रांत देशमुख यांनी गंभीर दखल घेत संबंधित बाबींवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. विक्रांत देशमुख यांनी काढलेल्या आदेशात टोईंग कारवाईदरम्यान गणवेशाशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्यास काम करण्यास परवानगी नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकृत ओळखपत्र गळ्यात परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आदेशाचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामकाज करण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# स्वच्छता मोहिमेनंतरही कचऱ्याचे ढीग; नागरिकांवर दंडात्मक कारवाईचा इशारा

लोणावळा (दैनिक संध्या) : लोणावळा नगर परिषदेकडून शहरात सातत्याने स्वच्छता अभियान राबवले जाते. दोन दिवसांपूर्वीदेखील नगर परिषद व संत निरंकारी ट्रस्ट यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबवत शहरातील सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता अभियानाला जेमतेम दोन दिवस झालेले असताना शहरातील शांती चौकामध्ये रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा पडल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. एक प्रकारे नागरिकांनी नगर परिषदेच्या आवाहनाला वाटाण्याच्या अक्षता दिल्या आहेत. मागील आठवड्यातदेखील मावळा पुतळा चौकापासून काही अंतरावर असलेल्या दुकानाशेजारी असेच मोठ्या प्रमाणामध्ये प्लास्टिक व कचऱ्याचे ढीग पाहिला मिळाले. भांगरवाडी, बाजारपेठ भागात काही ठिकाणी कचऱ्याचे ढीग पाहायला मिळतात. रेल्वे विभागात तर सर्वत्र मोठ्या प्रमाणात कचरा पाहायला मिळत आहे. देशभरामध्ये स्वच्छ भारत अभियान सुरू झाल्यापासून नगर परिषदेने या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेत सातत्याने दरवर्षी नामांकने प्राप्त केली आहेत. एकेकाळी कचऱ्याचे ढीग व त्यावरून तासंतास सभागृहामध्ये होणारे वादविवाद लोणावळाकर नागरिकांनी पाहिले आहेत. त्यानंतर तत्कालीन नगराध्यक्षा सुरेखा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेने स्वच्छता अभियानामध्ये भरघोस कामगिरी करत लोणावळा शहर कचराकुंडीमुक्त केले. तसेच वेगवेगळे स्वच्छता अभियान राबवत शहराला कचरामुक्त बनवले.

---

# तळेगाव एमआयडीसीतील कंपनीत गॅस गळती; २ कामगारांचा मृत्यू

**तळेगाव (दै. संध्या)**




तळेगाव एमआयडीसीतील एका कंपनीत अग्निशमन यंत्रणेच्या देखभाल कामादरम्यान कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) गॅसची गळती होऊन झालेल्या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला. तर, एकावर उपचार सुरू आहेत. ही घटना मंगळवारी (दि.९) दुपारी साडेबाराच्या सुमारास तळेगाव एमआयडीसी फेज-१ येथील शाफलर इंडिया कंपनीत घडली.

गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात अशी मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर, प्रमोद जैस्वार यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दुर्घटनेच्या वेळी शाफलर कंपनीचे कर्मचारी कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे देखील घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनाही किरकोळ स्वरूपाचा त्रास झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव एमआयडीसी येथील शाफलर इंडिया कंपनीतील अग्निशमन सिलिंडरच्या देखभाल आणि तपासणीचे काम उषा फायर सर्व्हिसेसच्या कर्मचाऱ्यांकडून सुरू होते. यावेळी गौरीशंकर शर्मा, वैभव थोरात, प्रमोद जैस्वार, कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे काम करत होते. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अग्निशमन सिलिंडरमधून अचानक $CO_2$ गॅसची गळती सुरू झाली. गॅसचा प्रादुर्भाव वाढल्याने तीन कर्मचारी बेशुद्ध पडले.

घटनेची माहिती मिळताच सहकाऱ्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. बेशुद्ध झालेल्या कर्मचाऱ्यांना उपचारासाठी पवना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात यांना तपासून मृत घोषित केले. प्रमोद जैस्वार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

या घटनेनंतर कंपनी परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. दुर्घटनेची माहिती मिळताच तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून गॅस गळती नेमकी कशामुळे झाली, सुरक्षा उपाययोजनांमध्ये काही त्रुटी होत्या का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये ६०० एमएलडी सांडपाणी थेट नद्यांत

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातून तब्बल 1 हजार एमएलडी घरगुती सांडपाणी तयार होत आहे. मात्र, त्यापैकी केवळ 400 एमएलडी पाण्यावर महापालिकेकडून प्रक्रिया केली जात आहे. उर्वरित 600 एमएलडी सांडपाणी थेट पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीत सोडले जात असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. परिणामी, नदी पात्रातील पाणी अतिदूषित करण्यात महापालिकेचाही सहभाग असल्याचे स्पष्ट होत आहे. महापालिकेकडून पवना नदीतून दररोज 550 एमएलडी पाणी घेऊन ते शुद्ध करून शहराला पुरवले जाते. तसेच, एमआयडीसीकडून दररोज 30 एमएलडी शुद्ध पाणी विकत घेतले जाते. ते पाणी एमआयडीसी पवना नदीतूनच उचलते. आंद्रा पाणी योजनेतून दररोज 90 एमएलडी पाणी निघोजे येथील इंद्रायणी नदीवरील बंधाऱ्यातून उचलले जाते. तर, मुळा नदीतून महापालिका पाणी उचलत नाही. महापालिका असे दररोज एकूण 670 एमएलडी पाणी संपूर्ण शहराला पुरवत आहे. तसेच, काही नागरिक, हाऊसिंग सोसायट्या, बंगलोधारक बोअरींग, विहीर, खासगी टँकर तसेच, पुर्नवापर केलेले पाण्याचा वापर करतात. असे एकूण 1 हजार एमएलडी पाणी दररोज शहवासीयांकडून वापरले जाते. त्यातून तितकेच सांडपाणी तयार होते.

---

# भोसरी-दिघी रस्त्याचे काँक्रिटीकरण संथ; वाहतूककोंडी व धुळीमुळे नागरिक त्रस्त

## सूचनाफलकांचा अभाव, अपघातांचा धोका आणि प्रदूषण वाढले; पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याची मागणी

**भोसरी (दै. संध्या)**

भोसरी-दिघी रस्त्याचे सुरू असलेले काँक्रिटीकरणाचे काम नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू लागले आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे वाहतूककोंडी, धुळीचे प्रदूषण आणि सुरक्षेच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. तोंडावर आलेला पावसाळा आणि अद्याप अपूर्ण असलेले रस्त्याचे काम यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. भोसरी-दिघी रस्त्याचे काम अखेर पूर्ण कधी होणार? असा संतप्त सवाल नागरिक पालिका प्रशासनाला विचारू लागले आहेत.

१२७० मीटर लांबीचा गंगोत्री पार्क ते राजमाता जिजाऊ उड्डाण पुलापर्यंत प्रभाग क्रमांक ७ व प्रभाग क्रमांक ५ या दोन प्रभागातून हा रास्ता जात आहे. भोसरी-दिघी हा शहरातील अत्यंत वर्दळीचा रस्ता असून, या मार्गावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहतूक करणारी वाहने ये-जा करतात. याच परिसरात शाळा, बाजारपेठ, व्यावसायिक आस्थापने आणि विविध दुकाने असल्याने दिवसभर



नागरिकांची मोठी वर्दळ असते; परंतु मागील काही महिन्यांपासून या रस्त्याचे कासव गतीने काम सुरू असल्याने वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

रस्त्याच्या कामादरम्यान आवश्यक सूचना फलक, पर्यायी मार्गदर्शक फलक आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे रस्त्याचे काम करताना पादचारी, वाहनचालक यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. संबंधित ठेकेदार मनमानी पद्धतीने काम करत असल्याने नागरिक व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे; परंतु महापालिकेचे संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत.

रस्त्याचे काम सुरू असल्याने अनेक ठिकाणी वाहने एकाच मार्गावरून वळवावी लागत आहेत. परिणामी सतत वाहतूककोंडी होत असून, वाहनचालकांमध्ये किरकोळ कारणांवरून वादाचे प्रसंगही घडत आहेत. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी वाहतूक कोंडी होते. काँक्रिटीकरणाच्या कामामुळे रस्त्यावर धूळ उडत असून, त्याचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. धुळीमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, नियमित पाणी फवारणी करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. काही दिवसांपूर्वी याच रस्त्यावरील खड्ड्यात एक चारचाकी वाहन अडकल्याची घटना घडली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अशा घटना प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटीमुळे घडत असल्याचे नागरिक सांगतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुसाफिरी यात्रेतून भटके विमुक्त समाजाला न्याय मिळणार – सुरेश खोपडे

मोरगाव, ता. बारामती (दैनिक संध्या) : भटके विमुक्त समाजाच्या विविध प्रश्नांबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली मुसाफिरी यात्रा आज पुणे जिल्ह्यातील मोरगाव येथे पोहोचली. देशभरात "कुडाची शाळा" म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शाळेचे संस्थापक अध्यक्ष व निवृत्त पोलीस अधिकारी मा. श्री. सुरेश खोपडे साहेब यांनी यात्रेचे स्वागत केले. यावेळी बोलताना खोपडे साहेब म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली असली तरी भटके विमुक्त समाजाला संविधानाने दिलेले अनेक हक्क व अधिकार अद्यापही पूर्णपणे मिळालेले नाहीत. आजही हा समाज पाल, तांडे, डोंगर आणि जंगल परिसरात राहून उपजीविकेसाठी भटकंती करत आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, निवारा, रोजगार आणि सामाजिक न्याय यांसारख्या मूलभूत सुविधांपासून हा समाज वंचित राहिला आहे. खोपडे साहेब यांनी मुसाफिरी यात्रेचे मार्गदर्शक ॲड. डॉ. अरुण आबा जाधव यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे आभार मानले. तसेच भटके विमुक्त समाजाची घरगणना व जनगणनेत योग्य नोंद होत नसल्यामुळे भविष्यात या समाजास अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते, अशी चिंता व्यक्त केली. भटके विमुक्त समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी ॲड. डॉ. अरुण आबा जाधव यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेली ही मुसाफिरी यात्रा उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ९ जिल्ह्यांतील ११० गावांपर्यंत पोहोचणार आहे. यात्रेदरम्यान शिक्षण, आरोग्य, घरकुल, अत्याचार, बेरोजगारी आदी विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात येत असून समाजातील नवयुवकांना सोबत घेऊन भविष्यात व्यापक चळवळ उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी प्रा. संतोष चव्हाण, तुकाराम शिंदे, ऋषी गायकवाड, जाकीर तांबोळी आदी उपस्थित होते.



### उद्योग महिलांच्या व्यवसायासाठी सकारात्मक

मुढाळे (दैनिक संध्या) : पंचायत समिती बारामती तालुका कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत वडगाव - मोरगाव प्रभागातील मौजे मुढाळे या ठिकाणी कृष्णाई समूहातील सविता संजय जाधव व त्यांचा मुलगा सुरज संजय जाधव यांना उमेद अभियान अंतर्गत सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा-होळ फाटा यांच्या सहकार्याने PMFME अंतर्गत ३५% सबसिडी मधुन १० लक्ष अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले.त्यामधून त्यांनी श्रीनाथ फूड या नावाने पापड उद्योग सुरू केलेला आहे.त्याच्या उद्घाटनाप्रसंगी उपस्थित राहून त्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.या उद्घाटन प्रसंगी मुर्डेश्वर महिला ग्राम संघाचे पदाधिकारी,गावातील विविध मान्यवर,DRP ढेरे मॅडम,ग्रामसखी ज्योती दरेकर मॅडम,वडगाव मोरगाव जिल्हा परिषद गटाचे प्रभाग समन्वयक सिकंदर आत्तार उपस्थित होते.



### जि. प. पुणे येथे कलाकार मानधन समस्या सुटल्याने कलाकार समाधानी

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या योजनेतून राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत कलाकार मानधन योजना अनेक वर्षापासून कार्यरत आहे. यापूर्वी मानधन मिळवण्यासाठी कलाकारांना पंचायत समितीच्या समाज कल्याणच्या विभागात जाऊन फाईल जमा करावा लागत होती. परंतु आता शासनाने ऑनलाईन पद्धत केल्याने प्रत्येक तालुक्याच्या पंचायत समितीमध्ये या कलाकार मानधनाविषयीची स्पष्टपणे माहिती मिळत नाही. किंवा मार्गदर्शन मिळत नाही. अशा तक्रारी अनेक कलाकारांनी तमाशा कलेचे अभ्यासक प्रा. काशिनाथ आल्हाट यांच्याकडे केल्या होत्या. अनेक कलाकारांच्या समस्या जाणून घेऊन पुणे येथील समाज कल्याण विभागातील गणेश ओव्हाळ साहेब यांच्याकडे त्या मांडण्यात आल्या.ज्या कलाकारांच्या समस्या आहेत अशा कलाकारांना आवाहन करून पुणे येथे बोलवण्यात आले. अनेक कलावंतांच्या वारस नोंद, बँक खाते, आधार लिंक, मानधन यादीत नाव नसलेल्या यासारख्या समस्या घेऊन कलावंत उपस्थित होते . त्या सर्वांच्या समस्या ऐकून या विभागाचे अधिकारी गणेश ओव्हाळ साहेबांनी सर्वांच्या समस्या सोडवण्याचे काम केले.त्यांच्यासह हृदय वर्तनाने कलाकार समाधानी झाले. यामध्ये जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे व शिवसेना नेते रोहिदास गोरडे यांचे उत्तम सहकार्य लाभले.

### जुन्नर शहरातील नियमबाह्य गतिरोधक हटविण्याची नागरिकांची मागणी

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर शहरातील काही ठिकाणी उभारण्यात आलेले गतिरोधक (स्पीड ब्रेकर) हे वाहतूक नियम व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नसल्याचा आरोप करत नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रार केली आहे. याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख शैलेश बनकर यांनी मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, चुकीच्या पद्धतीने उभारण्यात आलेल्या गतिरोधकांमुळे दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच रस्त्यावर पाणी साचणे, रुग्णवाहिकांच्या हालचालींना अडथळा निर्माण होणे आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासनाने शहरातील सर्व गतिरोधकांची पाहणी करून नियमबाह्य व चुकीच्या ठिकाणी उभारलेले गतिरोधक तात्काळ हटवावेत तसेच आवश्यक ठिकाणीच नियमानुसार गतिरोधक बसवावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी उपनगराध्यक्ष रुपालीताई परदेशी, गौरीताई महेश शेटे, विधानसभा संघटक संदीप भाऊ ताजणे, महानगर संघटक मयूर रोकडे, महानगर समन्वयक शिवदर्शन खत्री, माजी शहरप्रमुख समीर भगत, माजी नगरसेवक अविनभाऊ फुलपगार यांच्यासह अमोलभाऊ बनकर, साईनाथ डोके, जालिंदर रासकर, अक्षय कुटे, शिवानंद ढेकणे, ओंकार भुजबळ, सुदर्शन भगत, चिराग बिडवई , ऋषिकेश भुजबळ, प्रितेश लोखंडे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई : आरोपी अटकेत



बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी राज्यात प्रतिबंधित केलेल्या गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूच्या विक्री व साठवणुकीविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन व अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्त कारवाई करून मोठा साठा जप्त केला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्री.संदीप दिगंबरराव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 233/2026 भारतीय न्याय संहिता कलम 123, 223, 274, 275 तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक 09/06/2026 रोजी अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी श्री.संदीप शिंदे,सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी श्री. लक्ष्मीकांत सावळे व पंच यांच्या उपस्थितीत मे.धानेश्वरी किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स,शॉप नं. 85, विश्व एम्पायर,भिगवण रोड, जळोची,बारामती येथे तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा,पानमसाला व सुगंधित तंबाखूचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला.

सदर कारवाईत विविध ब्रँडचा गुटखा,पानमसाला व सुगंधित तंबाखू असा एकूण रु. 55,244/- किंमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये प्रीमियम आर.एम.डी.पानमसाला, एम सेंटेड तंबाखू, डायरेक्टर पान मसाला, विमल पानमसाला,व्ही-1 तंबाखू,गुलाम गुटखा,बाजीगर गुटखा,के.आर.1000 गुटखा आदी उत्पादनांचा समावेश आहे.

चौकशीदरम्यान सदर दुकानाचे मालक व विक्रेते गणेश गुरुशांताप्पा गुरुभेट्टी (वय 38 वर्षे, रा. बारामती) यांनी प्रतिबंधित अन्नपदार्थ कर्नाटक राज्यातून आणल्याचे सांगितले.मात्र त्याबाबत कोणतेही वैध खरेदी बिल अथवा कागदपत्र सादर करता आले नाही.

सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या या प्रतिबंधित अन्नपदार्थांची पुनर्विक्री अथवा पुनर्वापर होऊ नये यासाठी संबंधित साठा जप्त करण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या तपासात आरोपी गणेश गुरुशांताप्पा गुरुभेट्टी यास दिनांक 10/06/2026 रोजी अटक करण्यात आलेली असून त्याच्याकडून प्रतिबंधित अन्नपदार्थांचा पुरवठादार, वाहतूकदार,वितरक व उत्पादक यांच्याबाबत सखोल चौकशी सुरू आहे. सदर प्रकरणात केवळ किरकोळ विक्रीपुरता तपास मर्यादित न ठेवता प्रतिबंधित गुटखा व तंबाखूच्या राज्यातील चोरट्या व्यापाराची संपूर्ण पुरवठा साखळी उघड करण्याच्या दृष्टीने आर्थिक व्यवहार,वाहतूक व्यवस्था,पुरवठादार,वितरक व उत्पादक यांच्यापर्यंत तपास विस्तारित करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री.रामचंद्र शिंदे,बक्कल क्र. 2307,बारामती शहर पोलीस स्टेशन हे करीत असून तपास मा. अपर पोलीस अधीक्षक श्री.गणेश बिरादार,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड व पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## आळंदी देवराम नगर येथे अधिकमासानिमित्त हरिनामाचा गजर

आळंदी (दै. संध्या)



अधिकमासानिमित्त आळंदीतील देवराम नगर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून परिसरात हरिनामाचा अखंड गजर सुरू आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांतर्गत श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरीपाठ, किर्तन, प्रवचन, लोपामुद्राताई बनसोडे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीकृष्ण चरित्र कथा तसेच संगीत भजन यांचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजक मुरलीधर महाराज गावडे यांनी सांगितले. पुरुषोत्तम महाराज पाटील, ज्ञानेश्वर माऊली कुऱ्हाडे, आसाराम महाराज बढे, पंडित महाराज क्षीरसागर व अशोक महाराज पांचाळ यांच्या किर्तन सेवा व शंकर महाराज वानखेडे, श्रेया गावडे, एकनाथ महाराज हळदे, शंकर महाराज फपाळ यांच्या प्रवचन सेवेने धार्मिक वातावरणात भक्तिभाव, नामस्मरण आणि अध्यात्मिक विचारांचा प्रसार झाला आहे. अधिकमासाच्या पुण्यकाळात आयोजित या उपक्रमामुळे भाविकांना आध्यात्मिक लाभ मिळत असून हरिनामाच्या गजराने देवराम नगर परिसर भक्तिमय झाला असुन या सोहळ्यास श्री ज्ञानेश्वर महाराज चरीत्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, मा.नगराध्यक्ष रोहीदास तापकीर नगरसेवक दिनेश घुले, अविनाश तापकीर, सुरेश झोंबाडे, राहुल चव्हाण, संगिता चव्हाण, एकनाथ महाराज जाधव, शिवाजी महाराज बिरादार, ज्ञानेश्वर महाराज वाघमोडे सर, नितीन महाराज वडतकर इत्यादी उपस्थित होते.

## गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप



राजगुरुनगर (दै. संध्या)

श्री संत भोजलिंग काका सुतार समाज सेवा मंच च्या वतीने खेड तालुक्यातील पश्चिम भागातील श्री क्षेत्र कडूस, देवोशी, आडगाव ,कोरेगाव, साबुर्डी, वेताळे या गावातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय वस्तू चे वाटप करण्यात आले.

श्री.क्षेत्र कडूस येथे सुतार सेवा मंच चे संस्थापक अध्यक्ष सुदाम काका गायकवाड यांच्या शुभहस्ते झालेल्या शालेय वस्तू वाटप कार्यक्रम प्रसंगी देवोशीचे सरपंच काशिनाथ दिवेकर, साबुर्डीचे उपसरपंच विठ्ठलराव भालेराव, शंकरराव भालेराव, भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अण्णासाहेब गुरव, कोरेगाव सरपंच ज्ञानेश्वरराव गुंजाळ, कडूस यात्रा कमिटीचे दशरथ आण्णा धायबर, हवेली तालुक्यांचे उद्योजक मंचाचे संचालक अनिकेतराव गायकवाड, श्री संत सेना महाराज खेड तालुका उत्सव कमिटीचे सचिव आप्पासाहेब खंडागळे, उपाध्यक्ष शंकरराव गायकवाड, रामदास अभ्यंकर ,बजरंग दल कडूस शाखेचे ओंकार गुरव, माजी सरपंच रूपालीताई अभ्यंकर , कु श्रावणी अभंग,छायाताई दिवेकर, वनिताताई गायकवाड, शारदाबाई शिरसाट, अपर्णा सुतार अश्विनी भालेराव, विश्वकर्मा सुतार समाज धर्मशाळा आळंदीचे ज्येष्ठ संचालक शांताराम अभंग, ह.भ. प .सयाजी महाराज कोळेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या दरम्यान मनोगत व्यक्त करताना श्री संत भोजलिंग काका सुतार समाज सेवा मंचाचे अध्यक्ष मुरलीधर दादा केदारी यांनी सांगितले की सामाजिक दातृत्वाच्या, भावनेतून समाजातील प्रत्येक घटकांनी एकमेकांना मदत करायला हवी .आर्थिक स्थैर्य असलेल्या, नागरिकांनी आपल्या आजूबाजूच्या गरीब व गरजू बांधवांना मदत केली तर, स्वतःसोबत समाजाची, गावाची व देशाची प्रगती होईल. यावेळी माजी आदर्श जिल्हा परिषद सदस्य स्वर्गीय अशोक भाऊ शेंडे यांच्या स्मरणार्थ समाजातील गरीब ,गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी पाच हजार रुपयाची रोख स्वरूपात मदत केली जाईल, असे भैरवनाथ बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष अभिनाथ शेंडे यांनी यावेळी जाहीर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पासाहेब खंडागळे यांनी केले .कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खेड तालुका वारकरी साहित्य परिषदेचे सचिव -मंचाचे सदस्य शांताराम अभंग यांनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

## डिंभे धरणावर नव्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न



नारायणगाव (दै. संध्या)

कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १, नारायणगाव अंतर्गत नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी नुकतेच एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कालवा निरीक्षक, मोजणीदार आणि दप्तर कारकून या पदांवर नियुक्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश होता.प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून या कर्मचाऱ्यांनी हुतात्मा बाबू गेनू जलाशय , डिंभे धरण येथे प्रत्यक्ष भेट दिली.

नारायणगाव येथे कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १ अंतर्गत कार्यकारी अभियंता गणेश नन्नोर यांच्या मार्गदर्शनाखाली नवयुक्त कार्यरत दप्तर कारकुर ,कालवा निरीक्षक व मोजणीदार यांचे सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण चालू आहे .

यावेळी माजी विभागीय अधिकारी सुहास साळवे आणि शाखाधिकारी अक्षय सुरवसे यांनी कर्मचाऱ्यांना डिंभे धरण बांधण्यामागचा उद्देश,धरणाची रचना, पाणी साठवण्याची क्षमता, वीजनिर्मिती ,पॉवर हाऊस, कालावधी , बांधकाम पद्धत,ओलिताखालील सिंचन क्षेत्र आणि सांडव्यावरून पाणी सोडण्याची तांत्रिक पद्धत याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

आंबेगाव तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील डिंभे धरण हे पुणे ,अहिल्यानगर ,सोलापूर या तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जीवन वाहिनी बनले आहे. पुणे ,अहिल्यानगर, सोलापूर या तीन जिल्ह्यातील शेती सिंचनासाठी डिंभे धरणाच्या पाण्याचे मोठे महत्त्व आहे. त्यामुळे या धरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे सुहास साळवे यांनी प्रशिक्षणार्थींना धरणाविषयी माहिती देताना सांगितले. यावेळी येडगाव धरण, डिंभे धरण, पारगावतर्फे आळे येथे श्रीकृष्ण पाणी वापर संस्था व मुक्ताबाई पाणी वापर संस्थेला भेट देण्यात आली.

## सुवर्णाताई राक्षे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

चाकण (दै. संध्या)



चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णाताई शामभाऊ राक्षे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन मोठ्या थाटात नगराध्यक्षा मनिषाताई गोरे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, गटनेते नितीनभाऊ गोरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख प्रकाश वाडेकर, युवासेनेचे जिल्हा प्रमुख धनंजय पठारे, तालुका प्रमुख विशाल पोतले, माजी उपसभापती ज्योती अरगडे, शहरप्रमुख महेश शेवकरी, शहर प्रमुख अभिजीत जाधव, उपशहरप्रमुख किरण कौटकर, प्रकाश राजनकर, श्रीकांत जाधव, शहाजी राक्षे, योगेश जाधव आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटनेते नितीन गोरे यावेळी म्हणाले," दिवसेंदिवस चाकण शहराचा विस्तार प्रचंड वेगाने वाढत चालला असून, त्याच तुलनेत या भागात शिवसेना अधिक मजबूत होत असल्याने नगरपरिषद हद्दीत थाटण्यात आलेल्या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून गरजूंची लोकोपयोगी कामे होतील."

# ठेकेदार-प्रशासन संघर्षाचा फटका नागरिकांना

नारायणगाव (दै. संध्या)



स्थानिकांच्या मते, आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास हे काम अल्पावधीत पूर्ण होऊ शकते. दोन पोकलेन यंत्रांच्या सहाय्याने अवघ्या दहा दिवसांत काम पूर्ण करण्याची शक्यता असल्याचेही काही नागरिकांनी सांगितले. दरम्यान, ठेकेदाराने पूर्वपरवानगी न घेता रस्ता खोदल्याचा आरोप करत बेल्हे ग्रामपंचायतीने या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवण्याची भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या ७५ लाखांच्या पुलासंदर्भातील सुरू असलेले गौडबंगाल तातडीने थांबवून काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी बेल्हे परिसरातील नागरिकांनी केली आहे.

जुन्नर आणि पारनेर तालुक्यांना जोडणाऱ्या बेल्हे–कळस मार्गावरील गंगाधर ओढ्यावर नवीन पूल उभारण्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पुलासाठी जुना साकव पाडण्यात आल्याने मुख्य मार्ग बंद झाला असून परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. आमदार शरददादा सोनवणे यांच्या विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र शासन आणि पुणे जिल्हा परिषदेमार्फत या पुलासाठी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला, तरी कार्यारंभ आदेश मिळून चार महिने उलटूनही काम अर्धवट अवस्थेत असल्याने पावसाळ्याच्या तोंडावर ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, पुलाच्या कामासाठी जुन्या साकवाचे बांधकाम करण्यात आले. मात्र त्यानंतर कामाला अपेक्षित गती मिळाली नाही.

ठेकेदार आणि प्रशासन यांच्यातील समन्वयाचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि विविध परवानग्यांमुळे काम रखडल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या वादाचा फटका मात्र सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

सध्या घटनास्थळी मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये घाण पाणी साचले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भीती व्यक्त केली जात आहे .एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार ? असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

संबंधित विकासकाम रखडल्याच्या कारणांवरून ठेकेदार आणि प्रशासन यांच्यात मतभेद उघड झाले आहेत. ठेकेदार संदीप बांगर यांनी प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काम थांबले असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, डिसेंबर २०२५ मध्ये कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतरही कामासाठी आवश्यक असलेले ‘लाइन आऊट’ आणि माहिती फलकाचा मजकूर वेळेत उपलब्ध करून देण्यात आला नाही. याबाबत प्रशासनाला तब्बल ४० पत्रे देऊनही कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच प्रशासकीय विलंब आणि राजकीय दबावामुळे कामाच्या गतीवर परिणाम झाल्याचेही त्यांनी सांगितले.

दुसरीकडे, शाखा अभियंता रवींद्र होडगे यांनी या आरोपांचे खंडन करत कामाला झालेल्या विलंबामागे इतर कारणे असल्याचे स्पष्ट केले. कामासाठी नियुक्त करण्यात आलेले मजूर पश्चिम बंगालला परत गेल्याने तसेच आचारसंहितेच्या कालावधीमुळे कामाच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.संबंधित पुलाचे काम पुन्हा सुरू झाल्याचा दावा रवींद्र होडगे यांनी केला असला, तरी कामाच्या विलंबामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पुलासाठी असलेला जुना साकव आधीच पाडण्यात आल्याने हा मुख्य मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे.

या मार्गाच्या बंदीमुळे वाहनचालक, शेतकरी तसेच कोरठण खंडोबा देवस्थानाकडे जाणाऱ्या भाविकांना अनेक किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## भूमिहीन शेतकरी पत्नीच्या खांद्यावरून उतरले जोखड

मुंबई (दैनिक संध्या) : वीज पडून बैल दगावल्याने जोखडाला पत्नीला जुंपण्याची वेळ आलेल्या लातूर जिल्ह्यातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या व्यथेची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, अन् या शेतकरी कुटुंबाला अवघ्या काही तासात बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसान भरपाई पोटीची रक्कम मिळाली. यात मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश आणि जिल्हा प्रशासनासोबतच, अन्य विभागांनी दाखवलेली संवेदनशीलता चर्चेची ठरली आहे. या संवेदनशीलतेमुळे आता काशिनाथ गायकवाड यांना पत्नीला बैलाच्या जागी जुंपावे लागणार नसल्याने, या कष्टकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्दचे काशिनाथ गायकवाड भूमिहीन शेतकरी असून त्यांच्याकडे असलेल्या बैलजोडीच्या मदतीने गायकवाड व त्यांच्या पत्नी हौसाबाई परिसरातील शेतकऱ्यांची जमीन कसतात. मशागतीची, नांगरणी ते पेरणी, वखरणी अशी मिळेल ती कामे करतात, यावरच त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. यातच त्यांच्याकडील एका बैलाचा शुक्रवारी (५ जून) झालेल्या वादळी पावसात वीज पडून मृत्यू झाला. त्यामुळे मिळालेली कामे पूर्ण करण्यासाठी, गायकवाड यांना पत्नी हौसाबाई यांना जोखडला जुंपावे लागल्याचे वृत्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहचले. यावर त्यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानुसार प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या संपर्कात राहून, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांना महसूलसह, सर्व यंत्रणांना गायकवाड यांना तत्काळ मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तहसील कार्यालयासह, पशूसंवर्धन, कृषी सर्व यंत्रणा गायकवाड यांच्यापर्यंत पोहचल्या.

## लाखो विद्यार्थ्यांना दिलासा

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अधिक सुलभ, वेगवान आणि पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने 'स्टुडंट फॅसिलिटेशन सिस्टीम' सुरू केली आहे. या एकात्मिक डिजिटल व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सेवांसाठी एकाच व्यासपीठावर सुविधा उपलब्ध झाली असून लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या परीक्षा आणि निकालाबाबत तसेच उपकेंद्र स्थापन करणेबाबत आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कुलसचिव डॉ. अमित शेष, अधिष्ठाता (संशोधन व विकास) डॉ. एस. एम. पोरे, परीक्षा नियंत्रक डॉ. गीतांजली महामूणकर, डॉ. मुकुंद कुलकर्णी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

## नामांकनांना सुरुवात

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार 2026 साठी ऑनलाईन नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 31 जुलै 2026 निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज https://awards.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्याचे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे. भारतात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक आणि 31 जुलै 2026 रोजी 5 ते 18 वर्षे वयोगटातील बालके या पुरस्कारासाठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी स्व-नामांकन तसेच तृतीय पक्षाकडून शिफारस अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांना मान्यता दिली जाणार आहे. अर्ज करताना उमेदवारांनी वैयक्तिक माहिती, पुरस्काराचा प्रवर्ग, अलीकडील छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि तिच्या समाजावरील प्रभावाची माहिती 1,000 शब्दांपर्यंत सादर करावी लागणार आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांतर्गत शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण तसेच कला व संस्कृती या सहा क्षेत्रांमध्ये असाधारण कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यात येतो. शौर्य प्रवर्गात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्य दाखवणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो.

# प्रकल्प राबविण्यासाठी अहवाल सादर करावा : पंकजा मुंडे



■ मुंबई (दै. संध्या)

भटकंती करणाऱ्या मेंढपाळांची माहिती संकलीत करुन त्यांची भटकंती थांबविण्याच्या दृष्टीने प्रायोगिक तत्वावर अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन प्रकल्प योजना राबविण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे दिले. राज्यातील मेंढपाळांच्या भटकंती व स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे, अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे आदी यावेळी उपस्थित होते.

मंत्री मुंडे म्हणाल्या महाराष्ट्रातील बहुतांश मेंढपाळ मेंढीपालन व्यवसायासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण, आरोग्य, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने काही ठिकाणी जीवितहानीच्या घटनाही घडतात. या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करावा.अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्धबंदिस्त शेळी व मेंढीपालनासाठी आवश्यक पुढील उपाययोजना करण्यात येतील.

सध्या 'राजे होळकर महामेष योजना' अंतर्गत वैयक्तिक लाभाची योजना राबविण्यात येत आहे. ही योजना मेंढपाळ बचत गट किंवा सहकारी संस्थांना सामूहिक स्वरूपात दिल्यास एका ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करता येतील. त्यामुळे मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर कमी होऊन त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री भरणे म्हणाले की, मेंढपाळांच्या प्रगतीच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्यातील गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अधिकाऱ्यांना तातडीने पावले उचलावीत.

# रायगडमधील प्रलंबित रस्ते कामांना गती द्या

रस्त्यांचे मोजमाप व सीमांकन तातडीने पूर्ण करावे – मंत्री आदिती तटकरे

■ मुंबई (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रलंबित रस्ते आणि पाणंद रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया गतिमान करावी. गाव नकाशावर असलेल्या रस्त्यांच्या कामांची सद्य:स्थिती दर्शविणारा सविस्तर अहवाल सादर करावा; तसेच गावनकाशावर नोंद नसलेल्या प्रलंबित रस्त्यांचे मोजमाप आणि



आवश्यक सर्वेक्षणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून रस्ते विकासाच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत रायगड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गतचे रस्ते, पाणंद आणि प्रलंबित रस्ते विकास कामांचा तसेच राष्ट्रीय महामार्ग कोशिंबळे मार्गाशी संबंधित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री तटकरे यांनी सांगितले की, लोकसंख्या एक हजारपेक्षा अधिक असलेल्या गावांमधील रस्ते विकास कामांना प्राधान्य द्यावे. ग्रामीण भागातील नागरिकांना दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि विकासाच्या मुख्य प्रवाहाशी गावांचा संपर्क अधिक सक्षम व्हावा, यासाठी रस्ते प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. श्रीवर्धन तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रस्तावित रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक पॅनल तयार करून मंजुरी प्रक्रियेला गती द्यावी. रस्त्यांच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय बाबी वेळेत पूर्ण करून कामे प्रत्यक्ष सुरू करण्यावर भर देण्यात यावा.

# अकोला पीक विमा प्रकरणाचा तपासणी अहवाल सादर

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

■ मुंबई (दै. संध्या)



अकोला जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम २०२३-२४ आणि खरीप हंगाम २०२४-२५ मधील पीक विमा भरपाईसंदर्भातील तक्रारींचा जिल्हाधिकारी यांचा अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश देत या प्रकरणासंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकींचे इतिवृत्त मागवून चौकशी करण्याचे आदेशकृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला दिले.

खरीप व रब्बी हंगाम २०२३ – २४ व खरीप हंगाम २०२४– २५मधील एचडीएफसीइरगो इन्श्युरन्स कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणेबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषीमंत्री भरणे बोलत होते. बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी राज्यमंत्री अॅड आशिष जयस्वाल, आमदार हरीष पिंपळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, (व्ही.सी.व्दारे) कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक विनयकुमार आवटे, अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना, पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी बाळासाहेब गोपाळ,भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष राहुल राठी आदी उपस्थित होते. मंत्री भरणे म्हणाले की, अकोला जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम २०२३ आणि खरीप हंगाम २०२४ मधील पीक विमा भरपाई प्रक्रियेतील त्रुटी, शेतकऱ्यांचे आक्षेप आणि विमा कंपनीच्या कार्यपद्धती तपासा. या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत कोणत्याही परिस्थितीत विमा कंपन्यांच्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहू नयेत.या बाबत आतापर्यंत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या बैठकांचे व इतिवृत्ताचे अहवाल राज्य शासनाकडे सादर करावेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येऊन आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या हितार्थ निर्णय घेण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले.

# अवकाळी पाऊस, वादळीवाऱ्यामुळे बाधित फळपिकांचे पंचनामे त्वरित करा

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे : शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील मे व जून २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री भरणे बोलत होते.पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले(व्ही.सी.व्दारे), आमदार चंद्रकात पाटील, आमदार अमोल जावळे, कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह(व्ही. सी.व्दारे), कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार) रफीक नाईकवडी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार,उपव्यवस्थापक अतुल झनकर आदी बैठकीस उपस्थित होते.

मंत्री भरणे म्हणाले की, मे आणि जून २०२६ या कालावधीत राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या पावसामुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले असून त्याचे अचूक मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

जळगाव, बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये मोठ्याप्रमाणात फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. जळगाव जिल्ह्यात मे आणि जून महिन्यात मिळून 7 हजार 594 हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी 7 हजार 216 हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. जिल्हा प्रशासन, कृषी विभाग



आणि महसूल विभागामार्फत वेगाने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून सर्व पंचनामे पुढील दहा दिवसांत पूर्ण करावेत, असे निर्देशही मंत्री भरणे यांनी दिले. विमाधारक आणि विमाविहीन शेतकऱ्यांचे नुकसानही अचूक नोंदविण्यात यावे. आवश्यकतेनुसार ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वेक्षण पूर्ण करावे.शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची मदत वेळेत मिळण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी.

महसूल विभागाची मदत घेऊन बाधित शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत. सध्या अनेक शेतकरी अडचणीत असून त्यांना त्वरित मदत मिळणे गरजेचे असल्याचे मंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. बैठकीत राज्यातील बाधित क्षेत्र, पंचनामा स्थिती, केळी पिकावरील परिणाम तसेच पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.

# हरितीकरण एक लोकचळवळ बनवू या

■ मुंबई (दै. संध्या)



आषाढी वारीच्या परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देऊन राज्यातील पालखी मार्गांचे व्यापक हरितीकरण करण्यास शासन कटीबद्ध आहे. हा उपक्रम शासन, अध्यात्मिक संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून एक लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी निर्मल वारी आणि हरित वारी उपक्रमाच्या आढावा बैठकीत दिले. बैठकीत पालखी मार्गांवरील वृक्षारोपण आणि हरितीकरणाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पालखी मार्गावर वृक्ष संवर्धनासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, यासाठी पंढरपूर संस्थानचे विश्वस्त तथा संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजीराव मोरे यांनी केलेल्या विनंतीची प्राधान्याने दखल घेत या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

# मातीच्या फलकांपासून पुण्याच्या मंगळवार पेठेपर्यंत : जनगणनेचा इतिहास

(दै. संध्या)

- युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.

आज आपण जनगणनेचा विचार करतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर घराघरांत जाऊन माहिती गोळा करणारे कर्मचारी, संगणक, टॅबलेट आणि लोकसंख्येचे प्रचंड आकडे उभे राहतात. परंतु जनगणनेचा इतिहास हा केवळ लोक मोजण्याचा इतिहास नाही; तो मानवी संस्कृती, राज्यकारभार, करव्यवस्था, युद्ध, व्यापार आणि नागरी विकासाचा इतिहास आहे. एखाद्या राजव्यवस्थेला आपल्या राज्यात किती लोक आहेत, किती जमीन लागवडीखाली आहे, किती कर मिळू शकतो आणि युद्धकाळात किती सैनिक उभे राहू शकतात हे जाणून घेण्याची गरज होती. या गरजेतूनच जनगणनेचा जन्म झाला.



इतिहासकारांच्या मते जगातील सर्वात जुन्या जनगणनांचे पुरावे सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीच्या बाबिलोनिया आणि इजिप्तमध्ये आढळतात. त्या काळात लोकसंख्या, जनावरे, शेती उत्पादन आणि मालमत्तेच्या नोंदी मातीच्या फलकांवर कोरल्या जात होत्या. प्राचीन इजिप्तमध्ये नाईल नदीच्या पुरानंतर जमिनीचे पुनर्वाटप आणि कर आकारणीसाठी या नोंदी वापरल्या जात असत. चीनमध्ये इ.स. २ मध्ये झालेल्या जनगणनेत तब्बल ५ कोटी ७६ लाख लोकांची नोंद झाली होती, जी त्या काळातील जगातील सर्वात मोठी लोकसंख्या नोंद मानली जाते. रोमन साम्राज्यात तर जनगणना ही शासनव्यवस्थेचा अविभाज्य भाग होती. दर पाच वर्षांनी नागरिक, त्यांची मालमत्ता आणि सैनिकी क्षमता यांची नोंद घेतली जात असे. आज वापरला जाणारा "सेन्सस" हा शब्दही रोमन भाषेतील "सेन्सेरे" या शब्दापासूनच आला आहे.

भारतामध्येही जनगणनेची परंपरा फार जुनी आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नागरिकांची, त्यांच्या व्यवसायांची आणि मालमत्तेची नोंद ठेवण्याचे निर्देश आढळतात. मौर्यकालात प्रशासनाकडे अशा प्रकारच्या नोंदी उपलब्ध असत. मोगल काळात अबुल फजलने लिहिलेल्या आइन-ए-अकबरीमध्ये राज्याची लोकसंख्या, शेती, महसूल, उद्योग आणि सामाजिक जीवनाची विस्तृत माहिती दिली आहे. जरी ती आधुनिक अर्थाने जनगणना नसली तरी लोकसंख्याविषयक माहितीचा तो एक महत्त्वाचा स्रोत मानला जातो.

महाराष्ट्रात जनगणनेसाठी "खानेसुमारी" हा शब्द प्रचलित होता. पेशवाईच्या काळात महसूल, कर आकारणी आणि प्रशासनासाठी शहरातील घरे, वाडे, दुकाने, देवळे, मठ आणि रहिवाशांची नोंद ठेवली जात असे. या नोंदी आज इतिहास संशोधकांसाठी अमूल्य ठेवा ठरल्या आहेत. पुण्यातील विविध पेठांची खानेसुमारी त्यापैकीच एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

याचे सर्वात रोचक उदाहरण म्हणजे मंगळवार पेठेची इ.स. १८१८ नंतरची खानेसुमारी. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने पुण्याचा ताबा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांत ही नोंद तयार करण्यात आली. आज ही कागदपत्रे आपल्याला दोनशे वर्षांपूर्वीच्या पुण्यात प्रत्यक्ष फिरून आल्याचा अनुभव देतात.

या खानेसुमारीनुसार मंगळवार पेठेत एकूण २६१ घरे आणि ७०५ खण होते. आज एखाद्या मध्यम आकाराच्या गृहनिर्माण सोसायटीत जितकी घरे असतात, तितकी संपूर्ण पेठेत नव्हती. त्या घरांपैकी ७४ माडीची, ८३ एकमजली आणि ८५ छपरी घरे होती. म्हणजेच त्या काळातही घरांच्या प्रकारांवरून आर्थिक स्थितीचा अंदाज घेतला जात होता. विशेष म्हणजे १७ खुल्या जागांची आणि दोन देवळांची स्वतंत्र नोंद करण्यात आली होती. यावरून प्रशासनाची माहिती संकलित करण्याची पद्धत किती तपशीलवार होती याची कल्पना येते.

या पेठेतील सामाजिक रचनाही तितकीच मनोरंजक होती. ४२ ब्राह्मण, ४६ कुणबी-मराठे, २७ वाणी, १२ तेली, ६ मुसलमान, ४ जैन, ३ कुंभार, ३ गोसावी आणि १ सोनार यांची घरे येथे होती. आज ज्या विविधतेचा अभिमान पुणे बाळगते, तिची मुळे दोनशे वर्षांपूर्वीच्या या नोंदीत स्पष्ट दिसतात.

मंगळवार पेठेतील जीवन केवळ निवासी नव्हते; ते आर्थिक आणि प्रशासकीय दृष्ट्याही महत्त्वाचे होते. येथे चार सरकारी चौक्या कार्यरत होत्या. म्हणजेच त्या काळातही कायदा आणि सुव्यवस्थेसाठी संघटित यंत्रणा अस्तित्वात होती. दोन प्रमुख देवळे होती आणि त्यांना करमाफी देण्यात आली होती. गोसाव्यांचे मठ आणि काही इतर संस्थांनाही करसवलती मिळत होत्या. आजच्या करसवलतींच्या संकल्पनेची ही ऐतिहासिक झलक म्हणता येईल. या नोंदीत त्या काळातील प्रतिष्ठित व्यक्तींचाही उल्लेख आहे. महादेव मायेनकर, सिताराम नाईक चिकटे, बालाजीपंत दामले, भिकाजीपंत सुभेदार, हाणवतराव सितोले यांसारखे सावकार, सरदार आणि मुत्सद्दी या पेठेत राहत होते. त्यामुळे ही खानेसुमारी केवळ लोकसंख्येची नोंद नसून त्या काळच्या पुण्याच्या सामाजिक आणि आर्थिक अभिजनांचा आराखडाच ठरते. ब्रिटिशांनी १८७२ मध्ये भारतात पहिली व्यापक जनगणना करण्याचा प्रयत्न केला आणि १८८१ मध्ये पहिली अधिकृत, देशव्यापी आणि एकाच वेळी होणारी जनगणना पार पडली. तेव्हा भारताची लोकसंख्या सुमारे २५ कोटी होती. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींहून अधिक आहे. परंतु जनगणनेचे महत्त्व मात्र बदललेले नाही. पूर्वी ती कर आणि सैन्यासाठी वापरली जात होती; आज ती विकास, नियोजन, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्यायासाठी वापरली जाते.

म्हणूनच जनगणना ही केवळ आकडेवारी नसते. ती इतिहासाची टाइम मशीन असते. जशी मंगळवार पेठेची १८१८ मधील खानेसुमारी आपल्याला पेशवाईनंतरच्या पुण्याचे जिवंत चित्र दाखवते, तशीच आजची जनगणना भविष्यातील इतिहासकारांना आपल्या काळातील भारताचे दर्शन घडविणार आहे. दोनशे वर्षांनंतर कदाचित एखादा संशोधक आजच्या नोंदी वाचत असेल आणि आपल्या समाजाची कथा उलगडत असेल. म्हणूनच जनगणना म्हणजे केवळ लोकांची मोजणी नव्हे, तर काळाची नोंद होय. त्यामुळे सर्व जनतेनी यात सहभाग नोंदवावा. आलेल्या प्रगणकाला आपल्या देशाच्या विकासाच्या पायाभरणीचा दूत समजून त्याला सौजन्यपूर्ण वागणूक द्यावी. याबाबतीत प्रशासनानेही वेळोवेळी सहकार्याचे आवाहन केले आहे. चला आपण या शतकातल्या सर्वात मोठ्या जनगणनेत सहभाग नोंदवून साक्षीदार होऊ या...!!

# जेजुरीत सोमवार १५ रोजी सोमवती यात्रा

**दीड वर्षानंतर सोमवती पालखी सोहळा : सोमवती यात्रेनिमित्त मध्यरात्री दोन वाजता जेजुरी गडावरून निघणार पालखी सोहळा : पहाटे सहा वाजता कऱ्हा स्नान**

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाचा धार्मिकदृष्ट्या महत्वाचा असणारा सोमवती यात्रा पालखी सोहळा सोमवार दि 15 जून रोजी होत असून सोमवार दि 15 रोजी श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळा मध्यरात्री दोन वाजता जेजुरी गडावरून कऱ्हानदीकडे मार्गस्थ होणार आहे.पहाटे सहा वाजण्याच्या दरम्यान कऱ्हानदी वर देव आंघोळीचा धार्मिक सोहळा पार पडणार असल्याचे बैठकीत देवाचे इनामदार व मानकरी राजेंद्र पेशवे यांनी सांगितले.



जेजुरी येथील ऐतिहासिक छत्री मंदिर आवारात सोमवती यात्रेच्या नियोजनासाठी ग्रामस्थांची बैठक संपन्न झाली.

दरवर्षी सोमवार अमावस्येला सोमवती यात्रा भरते ,वर्षातून दोन वेळा ही यात्रा येते. मात्र मागील वर्षी तिथींचा क्षय झाल्याने दीड वर्षाने सोमवती यात्रा भरत आहे .या यात्रेच्या नियोजनासाठी श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी व ग्रामस्थाच्या बैठकीचे मंगळवार दि ९ रोजी सायंकाळी ऐतिहासिक छत्री मंदिर परिसारात आयोजन करण्यात आले होते. सोमवार दि 15 रोजी सोमवती यात्रा असून रविवार दि 14 रोजी दुपारी 12 वाजून 20 मिनिटांनी अमावस्या सुरु होत आहे.सोमवार दिनांक 15 रोजी सकाळी 8 वाजून 34 मिनिटांपर्यंत आमावस्या आहे.

सोमवारी पहाटे 2 वाजता कऱ्हास्नानासाठी जेजुरी गडावरून खंडोबा देवाचा पालखी सोहळ्याचे प्रस्थान होईल पहाटे सहा वाजण्याच्या दरम्यान खंडोबा व म्हाळसा देवीच्या उत्सव मूर्तींना कऱ्हा नदीवर अंघोळ घालण्यात येईल व सकाळी 9 वाजता पालखी सोहळा गडावर पोहचून पाकळणी करण्यात येईल असे या बैठकीत राजेंद्र पेशवे यांनी सांगितले.

यावेळी श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी,ग्रामस्थ समितीचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,राजेंद्र पेशवे, रोहिदास माळवदकर,संतोष खोमणे पाटील, कृष्णा कुदळे,छबन कुदळे, सुधीर गोडसे,सुशील राउत, पुंडलिक दावलकर,अनिल झगडे,नागनाथ झगडे,शैलेश राऊत,राजेंद्र चौधरी,प्रसाद अत्रे, राजाभाऊ खाडे,सोमनाथ उबाळे, वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी,उमेश जगताप,श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष विश्वास पानसे, पोपट खोमणे,मंगेश घोणे,जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले,पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील,आदी उपस्थित होते.

भेसळयुक्त भंडाऱ्यावर निर्बंध घालण्यासाठी दुकानदारांनी शुद्ध भंडार विक्रीसाठी ठेवावा.

जेजुरी देवसंस्थानच्या वतीने सोमवती यात्रे निमित्त ठिकठिकाणी मंडप,वीज,पाणी नाष्टा,शहरातील सर्व मंदिरात विद्युत रोषणाई, व्यवस्था करण्यात येणार असल्याचे देवसंस्थांचे अध्यक्ष विश्वास पानसे यांनी सांगितले. जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने पालखी सोहळा मार्गाची पाहणी करण्यात आली असून रस्त्याची डागडुजी,पिण्याचे पाणी,पालखी मार्गावर लाईट, फिरते शौचालय आदी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी सांगितले. तसेच पालखी सोहळ्यात भाविकांची सुरक्षितता,कायदा आणि सुव्यवस्था,वाहतुकीचे नियंत्रण यासाठी जादा पोलिस दल तैनात करण्यात आले असल्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी सांगितले.

अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने भंडाराची तपासणी करण्यात येणार असून भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. कऱ्हा नदीवर धार्मिकविधी साठी सर्वांनी सहकार्य करावे, जेजुरी गडावर मारामारी,भांडणे या सारखे प्रकार वाढले असून यातून जेजुरीची बदनामी होवू नये याबाबत देवसंस्थानने लक्ष द्यावे, सुरक्षा रक्षक वाढवावेत असे ग्रामस्थ मंडळाचे सचिव छबन कुदळे यांनी सांगितले,

ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी पालखी मार्गावर वीज,पाणी,पालखी सोहळ्यात चेंगराचेंगरी होऊ नये यासाठी सुरक्षा रक्षक ठेवावेत, भंडारा भेसळ बाबतीत कडक कारवाई व्हावी अशा सूचना केल्या.

सामाजिक कार्यकर्ते गिरीश झगडे यांनी दवणे मळा येथील विसावा कट्ट्याला फुलाई मळा कट्टा असे नाव द्यावे,जेजुरी गडावरील अतिक्रमण काढावे,गडावर चोवीस तास रुग्णवाहिका ठेवावी,शुद्ध पाण्याची व्यवस्था ठेवावी आदी प्रश्न उपस्थित केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पर्यावरण रक्षणासाठी पद्मा फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद : प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

पुणे (दैनिक संध्या) : पर्यावरणाचा समतोल राखून भावी पिढीला सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून द्यायचे असेल, तर मोठ्या प्रमाणात झाडे लावून ती जागवायला हवीत. प्रत्येकाने एक झाड लावून या उपक्रमात सहभागी व्हायला हवे, असे प्रतिपादन पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. आईप्रमाणेच माणसाच्या जगण्याला निःस्वार्थपणे श्वास व मायेची सावली देणाऱ्या वृक्षांप्रती आपण कायम कृतज्ञ राहायला हवे, तसेच पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांचे पर्यावरण क्षेत्रातील कार्याचे तरुणांनी अनुकरण करावे, असे आवाहन पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पद्मा फाउंडेशनच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत ५,००० झाडे लावण्याच्या अभियानाचा शुभारंभ प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. सिंहगड रस्त्यावरील मॉंटेरोसा सोसायटीच्या आवारात आयोजित कार्यक्रमात उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका वर्षा तापकीर, नगरसेविका ज्योती गोसावी, उद्योजक तुषार गोसावी, उद्योजक जवाहर चोरगे, मुख्याध्यापिका अनुराधा निकम, वारकरी आचारसंहिता परिषदेचे मुख्य प्रवर्तक निलेश महाराज झरेकर, संयोजक व पद्मा फाउंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे आदी उपस्थित होते.

### बैलजोडी निवडीवरून वाद; उमेश रानवडे यांचे आज महाद्वार चौकात बैलजोडी सहीत उपोषण

आळंदी (दैनिक संध्या) : श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२६ साठी मानाच्या रथास बैलजोडी निवडीच्या प्रक्रियेवर आक्षेप घेत आळंदी येथील उमेश लक्ष्मण रानवडे यांनी बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. आज शुक्रवार (दि.११ जून) रोजी सकाळी ११ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरासमोर बैलजोडीसह उपोषणास बसणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. उमेश रानवडे यांनी निवेदनाद्वारे दावा केला आहे की, पालखी रथासाठी बैलजोडी सेवा देण्याबाबत त्यांनी वेळेत अर्ज केला होता. मात्र, त्यांना निवड प्रक्रियेसाठी बोलावण्यात आले नाही तसेच त्यांच्या अर्जाचा विचार न करता परस्पर निर्णय घेण्यात आला. बैलजोडी निवड समितीच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी आक्षेप घेतला आहे. यासंदर्भात त्यांनी देवस्थान प्रशासनाकडे अनेक वेळा अर्ज करूनही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे न्याय मिळावा, निवड प्रक्रियेचा फेरविचार करावा व समितीच्या अधिकृततेबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी देवस्थान समिती अथवा संबंधित निवड समितीकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

## व्यवसायाभिमुख व रोजगारक्षम पिढीसाठी कौशल्याधारित प्रशिक्षणाची गरज

पुणे (दै. संध्या)

- राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांचे प्रतिपादन
- 'लेंड अ हॅंड इंडिया' संस्थेचा २० वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात

"पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत काळानुरूप बदल अपेक्षित आहेत. रोजगारक्षम व व्यवसायाभिमुख पिढी घडवण्यासाठी, तसेच आधुनिक विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी अभ्यासक्रमासह व्यावहारिक आणि प्रात्यक्षिकांवर आधारित कौशल्य प्रशिक्षणाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले. पदवीसह रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करावीत आणि शालेय वयातच विद्यार्थ्याला प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, यासाठी ९० तासांची इंटर्नशिप देण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. कौशल्य विकास आणि प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण देत विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या 'लेंड अ हंड इंडिया' (लाही) संस्थेच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात सचिंद्र प्रताप बोलत होते. पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यात उद्योजक प्रतापराव पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. कमलादेवी आवटे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, 'लाही' संस्थेचे सहसंस्थापक सुनंदा माने व राज गिल्डा, अध्यक्ष मिलिंद माने आदी मान्यवर उपस्थित होते.

## जुन्नरला पुन्हा मोकळा श्वास घेऊ द्या; गुन्हेगारीचे ग्रहण का?

पुणे (दै. संध्या)

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला जुन्नर तालुका म्हणजे इतिहास, संस्कृती, शिक्षण, अध्यात्म आणि निसर्ग यांचे अद्भुत संगमस्थान. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला हा तालुका केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण देशाचा अभिमान आहे. लेण्याद्रीचा अष्टविनायक गणपती, ओझरचा विघ्नहर, कुकडेश्वर मंदिर, हरिश्चंद्रगड, खिरेश्वर, माळगंगा देवीचे मंदिर, नाणेघाट, शिवनेरी यांसारख्या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांनी हा परिसर समृद्ध केला आहे. डोंगर-दऱ्या, माळराने, धरणे, शेतजमिनी आणि कष्टकरी माणसांनी हा तालुका घडविला आहे. जुन्नरची खरी ओळख मात्र त्याच्या माणुसकीत आहे. इथल्या लोकांनी समाजकारण, शिक्षण आणि लोकहिताची परंपरा पिढ्यान्पिढ्या जपली आहे. महाराष्ट्राला अनेक समाजसुधारक, शिक्षक, राजकारणी आणि लोकनेते देण्याचे भाग्य या भूमीला लाभले आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जुन्नर-ओतूरशी असलेले नाते तर इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या सहकार्याने ओतूर येथे मुलींची शाळा सुरू करून फुले दांपत्याने स्त्रीशिक्षणाची क्रांती या भागात आणली. १८७७ च्या दुष्काळात सावित्रीबाई स्वतः ओतूर येथे राहून हजारो दुष्काळग्रस्तांना मदत करत होत्या. सत्यशोधक चळवळीचा आणि सामाजिक न्यायाचा दीप या भूमीतही तेवत राहिला. अशा या संस्कारक्षम, इतिहासप्रसिद्ध आणि शिक्षणप्रेमी तालुक्यात गेल्या काही वर्षांत वाढत चाललेली गुन्हेगारी चिंतेचा विषय ठरत आहे. पारगाव-मढ-बागडवाडी येथील धक्कादायक घटना, कोयता गँगचे वाढते प्रस्थ, नेतवडमधील सोन्याची चोरी, वेगवेगळ्या परिसरातील विविध घरफोड्या, महिलांविरुद्ध घडणारे गुन्हे आणि वाढती दहशत यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. प्रश्न असा आहे की, ज्या भूमीने शिवराय घडवले, फुले घडवले, समाजसुधारक घडवले, त्या भूमीत गुन्हेगारीची बीजे का रुजत आहेत?

### गावागावांनी काय करावे?

१. प्रत्येक गावात "ग्राम सुरक्षा समिती" सक्रिय करावी.
२. युवकांसाठी क्रीडा स्पर्धा, व्यसनमुक्ती अभियान आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवावेत.
३. गावातील सीसीटीव्ही व्यवस्था मजबूत करावी.
४. रात्रीची गस्त आणि नागरिक-पोलिस संवाद वाढवावा.
५. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कायद्याचे शिक्षण, सायबर गुन्हे आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन व्हावे.
६. संशयास्पद हालचालींबाबत नागरिकांनी तत्काळ माहिती द्यावी.
७. धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांनी युवकांना विधायक मार्गावर नेण्यासाठी पुढाकार घ्यावा.
८. व्यसनमुक्ती आणि समुपदेशन केंद्रांची संख्या वाढवावी.

## रेशनकार्डधारकांच्या निवडीचे निकष बदला अन् कमिशनमध्येही वाढ करा

**दुकानदारांचे कमिशन ५०० रुपये करण्याची शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांची आग्रही मागणी**

कवठे येमाई (दै. संध्या)



रेशनकार्डधारकांच्या निवडीचे निकष बदलावेत तसेच दुकानदारांचे कमिशन प्रति क्विंटल ५०० रुपये करावे अशी आग्रही मागणी शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनी या वेळी केली असून इतर ही रास्त मागण्या पुणे जिल्हा स्वस्त धान्य व केरोसीन परवानाधारक संघटनेच्या प्रतिनिधींच्या बैठकीत करण्यात आल्या. ही बैठक पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील गहुंजे येथे नुकतीच पार पडली.

बैठकीत रेशन व्यवस्थेशी संबंधित विविध अडचणी, वाढती महागाई आणि परवानाधारक दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यात आली. जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल, शिरूर तालुका अध्यक्ष गणेश रत्नपारखी,जुन्नरचे सुनील गुंजाळ, मावळ तालुका अध्यक्ष बाबूलाल नालबंद, तालुका कार्याध्यक्ष अंकुश आंबेकर, मुळशी तालुकाध्यक्ष संतोष सातपुते,उपाध्यक्ष प्रकाश बुचडे,योगेश मरळ,पुरंदरचे अशोक अण्णा दळवी,आंबेगाव चे सतीश घोलप यांच्यासह विविध तालुक्यांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत सध्या लागू असलेले रेशन कार्ड धारकांच्या पात्र लाभार्थी निवडीचे निकष कालबाह्य ठरल्याचे मत व्यक्त करण्यात आले. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हे निकष बदलून अधिकाधिक पात्र नागरिकांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी जोरदार करण्यात आली.जीवनावश्यक वस्तू व सेवांचे वाढलेले दर लक्षात घेऊन रेशन दुकानदारांना मिळणारे कमिशन किमान प्रति क्विंटल ५०० रुपये करण्यात यावे,अशी मागणी संघटनेच्या बहुसंख्य पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रेशन व्यवस्थेद्वारे पाच जीवनावश्यक वस्तूंचे वितरण सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे ही बैठकीत नमूद करण्यात आले.

बैठकीत उपस्थित असलेल्या ३५ पेक्षा अधिक प्रतिनिधींनी सर्व प्रलंबित मागण्यांवर एकमताने निर्णय घेतला. तसेच विविध अडचणींबाबत शासनाकडे निवेदन सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. चालू जून महिन्यासाठी मंजूर करण्यात आलेले केरोसीन अत्यल्प प्रमाणात असल्याने प्रत्येक रेशनकार्डधारकाला किमान चार लिटर केरोसीन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. यामुळे एलपीजी गॅस सिलिंडरवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होईल, असे प्रतिनिधींनी सांगितले.

## राणुबाईमळा येथे शौचालयाच्या बांधकामाचे थाटात उद्घाटन

चाकण (दै. संध्या)

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांची प्रेरणा घेऊन चाकण नगरपरिषद हद्दीतील राणुबाईमळा येथे अंगणवाडी क्र. ८० मधील चिमुकली मुले व मातांच्या सुविधेसाठी अत्यंत गरजेच्या असलेल्या नवीन शौचालयाच्या बांधकामाचे उद्घाटन नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले. याप्रसंगी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेविका आरती परदेशी, स्वाती लेंडघर, हर्षद लेंडघर, मंगेश कांडगे, विकास धाडगे, जयश्री नायकवाडी, हेमंत बिरदवडे, सागर धाडगे, धीरज केळकर, संतोष लेंडघर, अभिजीत बिरदवडे, राहुल कांडगे, महेश शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनीषा गोरे यावेळी म्हणाल्या," चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता व अंगणवाडीचा विकास करण्यास आम्ही कटिबद्ध राहू. स्व.आ. सुरेश भाऊ गोरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून गावचा विकास हाच आमचा ध्यास राहील. राणूबाईमळा येथील शौचालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात येईल. येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी लागणारे सर्व सहकार्य नगरपरिषदेच्या माध्यमातून केले जाईल." नगरसेविका स्वाती लेंडघर यांनी सांगितले की," बालकांसाठी राणुबाईमळा येथे शौचालयाची नितांत गरज होती.

## सर्व जिल्ह्यांत पत्रकार भवनासाठी जागा देणार - बावनकुळे

**मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात घोषणा**

पुणे (दै. संध्या)



मराठी पत्रकार संघाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन २०२६ आज यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा केली. पिंपरी-चिंचवड शहरात पत्रकार भवनासाठी जागा देण्याची मागणीही मान्य करण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले.

महाअधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णू देव वर्मा होते. व्यासपीठावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रेरक वक्ते गौर गोपाल दास, सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक निलेश खरे, एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, पुढारी माध्यम समूहाच्या मल्टीमीडिया संपादक मृणालिनी नानिवडेकर, राज्यपालांचे सचिव प्रशांत ननावरे, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

महसूल खात्यात काम करताना ऐतिहासिक व क्रांतीकारक निर्णय घेतल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा, तसेच आपल्या ओघवत्या वाणीने तरुण पिढीत चैतन्य निर्माण केल्याबद्दल गौर गोपाल दास यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, “माझ्या जडणघडणीमध्ये पत्रकारांचा मोठा वाटा आहे. समाजाचा आरसा बनवून पत्रकार आम्हाला विविध कामे सुचवतात. चुका दाखवून देतात. त्यामुळे आधी प्रभावी विरोधक म्हणून आम्हाला काम करता आले आणि आता आम्ही लोकाभिमुख राज्यकारभार करू शकत आहोत. पत्रकारांचे राज्याच्या विकासामध्ये योगदान मोठे आहे.”

ते पुढे म्हणाले की, पुणे-मुंबई प्रमाणे राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये पत्रकार भवनासाठी जागा दिली जाईल. पत्रकारांच्या विविध मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून त्याबाबत वेळोवेळी निर्णय घेतले आहेत तसेच भविष्यातही घेण्यात येतील.

यावेळी बोलताना राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले, “महाराष्ट्राचा राज्यपाल म्हणून काम करत असताना मी मराठी भाषा देखील शिकत आहे. मराठी वृत्तपत्रांचा मला त्यासाठी उपयोग होत आहे. यावेळी मी इंग्रजीत बोलत असलो तरी पुढच्या वेळी मी मराठीत भाषण करीन.” कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेची गुणवत्ता अधिक वाढण्यास मदत होईल. पत्रकारांनी नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

'पत्रकारांचे मानसिक स्वास्थ्य' या विषयावर गौर गोपाल दास यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, “अलीकडे आपली नोकरी टिकवण्यासाठी पत्रकार अनेक दडपणांखाली काम करताना दिसतात. बहुतांश पत्रकारांनी समाजापुढे सत्य मांडण्यासाठी पत्रकारिता हा व्यवसाय स्वीकारलेला असतो. पत्रकारांना अनेक गोष्टी मनाविरुद्ध कराव्या लागतात, पण त्यातूनही मार्ग काढत पत्रकारांनी यथाशक्ती सत्याची मांडणी करावी. त्यामुळे त्यांची घुसमट कमी होऊन त्यांना मानसिक स्वास्थ्य लाभेल.”

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पत्रकारांच्या योगदानाबाबत गौरवोद्गार काढले. मृणालिनी नानिवडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

हिंदुस्तान टाइम्सचे डिजिटल संपादक हारीस शेख यांनी प्रात्यक्षिकांसह पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले. “एआय हा पत्रकारांसाठी मदतनीस आहे, मात्र तो पत्रकार होऊ शकत नाही,” असे ते म्हणाले.